मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक १० • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • ऑक्टोबर-२०२३



# हसती दुनिया
(मराठी)

अंक १० • वर्ष २० वे • पृष्ठे ५२ • ऑक्टोबर-२०२३

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे • राजनंदन कृ. पिंपळकर
श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : hduniya.marathi@nirankari.org
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९


०५


०८

## स्तंभ

- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- कुतूहल ३४
- आरोग्याचा मंत्र ३६
- सामान्य ज्ञान ४७
- रंग भरा ५०

## चित्रकथा

- चित्रकथा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष : सुब्रह्मण्यम चंद्रशेखर ०७
- दिनविशेष : भारतीय वायुसेना दिवस १५
- विशेष : डिप्रेशन (मानसिक तणाव).. २०
- संतकथा : पुत्राचा भ्रम दूर झाला २१
- विशेष : इस्त्रो-भारताच्या अवकाश.. २४
- भ्रमंती : पारोळ्याचा भुईकोट किल्ला २८
- कुतुहल: आपल्याला पाच बोटे का.... ३४
- प्रेरक प्रसंग : आनंदी जीवनाचं रहस्य ३५
- विशेष : साहित्य अकादमी पुरस्कार ४२
- विशेष : भारतातील प्रसिध्द ..... ४६
- कृत्रिम बुध्दिमत्ता (आर्टिफिशियल... ४८





## कथा


- ईश्वरकृपेने घडे सकळ ०५
- अहंकाराचा नाश ०८
- जसा विचार, तसा परिणाम २२
- सुधारणा स्वतःपासून २३
- यश टिकवता आले पाहिजे ३२
- चांगलं तेच द्यावं ४४





## कविता


- आपली खाद्य संस्कृती १२
- बापूजी ३३
- सण दसरा साजरा करु या ४३









दोन शब्द

# सण आणि शिकवण

भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये सांगितलं आहे, की ज्या ज्या वेळी या धरतीवर अधर्म वाढतो, तेव्हा तेव्हा सज्जनांचं रक्षण करण्यासाठी मी विविध अवतार धारण करतो. असे अनेक अवतार भगवंतांनी आजपर्यंत धारण केले. त्रेतायुगात प्रभू-परमात्मा श्रीराम रुपात आले. द्वापार युगात श्रीकृष्ण रुपात आले तर कधी देवी-देवतांच्या रुपाने आले. त्यांच्या अवतारकार्याचं स्मरण आणि त्यांची शिकवण आपण अंगी बाळगावी, भगवंताविषयी कृतज्ञता बाळगावी यासाठी काही सण-उत्सव साजरे केले जातात.

आपल्या प्रत्येक सण-उत्सवात अध्यात्म लपलेलं आहे. केवळ रिवाज किंवा परंपरा म्हणून त्याकडे पाहिले तर त्यामध्ये अनिष्ट गोष्टी समाविष्ट होऊन त्या सण-उत्सवाला विकृत स्वरुप प्राप्त होतं. श्रावण महिना सुरु झाला, की सणांची मालिकाच लागली. बाळ गोपाळांचा आवडता सण म्हणजे दहीहंडी. एकजुटीने राहून आपल्या हक्कांकडे, शरीरपुष्टतेकडे लक्ष वेधून घेणारा सण! तसेच स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्देशाने लोकांना संघटित करण्यासाठी टिळकांनी सुरु केलेला सार्वजनिक गणेश उत्सव! त्यानंतर येणारा नवरात्र उत्सव. प्रभू रामचंद्रांनी शबरीला नवविधा भक्ती शिकवली. ही नवविधा भक्ती ज्याच्या जीवनात येते तो दश इंद्रियांचा विजेता होतो आणि हा विजय म्हणजेच दसरा. नऊ प्रकृती व्यापून उरलेल्या निर्गुण निराकार परब्रह्म परमात्म्याची प्राप्ती म्हणजेच दसरा. या सणांविषयी काही पौराणिक संदर्भही वाचायला मिळतात. ज्या दिवशी प्रभू श्रीरामचंद्रांनी रावणावर विजय मिळवला तो हा दिवस. श्रीराम हे सद्गुणांचं, तर रावण हे दुर्गुणांचं प्रतीक! सद्गुणांनी अंत:करणातील दुर्गुणावर विजय मिळवावा. तन-मन निर्मळ आणि प्रसन्न व्हावे, कोणाविषयी द्वेषभाव राहू नये, हा या मागचा खरा उद्देश आहे. याच दिवशी पांडवांनी वनवास संपवून शमी वृक्षावरची शस्त्रास्त्रे काढून त्यांची पूजा केली होती. देवीने महिषासुराचा वध केला, तोही हाच दिवस. या साऱ्या घटना हेच दर्शवतात, की दैवी गुणांच्या साहाय्यानेच दुर्गुणावर, आसुरी प्रवृत्तीवर विजय प्राप्त करता येतो.

या सणाच्या निमित्ताने ही दैवी शिकवण जर लक्षात घेतली तर खऱ्या अर्थाने सणाचा आनंद आपण प्राप्त करु शकतो.

- राजेंद्र थोरात



पौराणिक कथासार

# ईश्वरकृपेने घडे सकळ

रामायणातील सुंदरकांड मधला हा एक प्रसंग आहे. भक्त हनुमान हे श्रीरामांचे निस्सीम आणि समर्पित भक्त होते. विनम्रता आणि सजगता त्यांच्या नसानसात भिनलेली होती.

प्रसंग असा होता, रावणाने माता सीतेला अशोक वाटिकेत आणून ठेवले होते. सभोवार राक्षसिनींचा पहारा होता. रावण वारंवार माता सीतेला आपल्याशी विवाह कर म्हणून धमकावत असे. एके दिवशी तो तलवार घेऊन रागारागाने माता सीतेला मारण्यासाठी अशोक वाटिकेत आला, तेव्हा हनुमान सूक्ष्म रुप घेऊन झाडावर बसले होते. हनुमानाला वाटलं, की त्याची तलवार हिसकावून घेऊन त्याचा शिरच्छेद करावा; परंतु पुढच्याच क्षणी त्यांनी पाहिलं, की रावणाची पत्नी मंदोदरी हिने रावणाचा हात पकडला आणि त्याला हे कर्म करण्यापासून थांबवलं.

हे दृश्य पाहून हनुमान खूप आनंदित झाले आणि विचार करु लागले, की जर मी पुढे गेलो असतो तर मला भ्रम झाला असता, की 'मी' नसतो तर माता सीतेला कोणी वाचवलं असतं? परंतु मातेला वाचवण्याचं कार्य तर प्रभूंनी रावणाच्या पत्नीला

आधीच दिलेलं होतं. रामभक्त हनुमान मनोमन प्रभू श्रीरामांना धन्यवाद देऊ लागले, "हे प्रभू, तू धन्य आहेस. तू तुझं कार्य कोणाकडूनही करुन घेऊ शकतोस. मला अहंकारी होण्यापासून वाचवलंस."

रावण तिथून निघून गेल्यावर रावणाच्या दोन दासींचा संवाद हनुमानाच्या कानावर पडला. एक दासी दुसऱ्या दासीला सांगत होती, की लंकेमध्ये एक वानर आला आहे. तो आता सगळी लंका जाळून टाकणार आहे. हनुमान विचार करु लागले, की प्रभू श्रीरामांनी तर लंका जाळण्याचा आदेश दिलेला नाही आणि तसंही माझ्याकडे ना तेल आहे, ना पलिता, मग मी लंका कशी जाळणार ? मग ही दासी असं का बोलतेय.... ?

रावणाच्या सैनिकांना जेव्हा हनुमानाने अशोक वाटिका उद्ध्वस्त केल्याचं समजलं तेव्हा त्यांना पकडण्यासाठी अनेक योध्दे आले; पण.... हनुमानाने त्यांना पराभूत केले. शेवटी रावणपुत्र मेघनाद याने ब्रह्मास्त्र सोडल्यावर हनुमानाने ब्रह्मदेवांचा मान ठेवत कोणताही प्रतिकार केला नाही व स्वतःला बंदिस्त करुन घेतलं. रावणाचं सैन्यबळ किती आहे याचाही अंदाज हनुमानाला घ्यायचा होता.

हनुमानाला जेव्हा रावणापुढे उभं केलं तेव्हा त्यांनी सीता मातेला सन्मानाने सोडून देण्याचा श्रीरामांचा संदेश रावणापुढे ठेवला. ते ऐकून रावण रागाने हनुमानाला मारण्यास निघाला. तेव्हा बिभीषण रावणाला मध्येच अडवत म्हणाला, "हे लंकेश, एखाद्या दूताला मारणे हे राजाला शोभत नाही, त्याला सोडून द्यावे."

हनुमान विचार करु लागले, की इथंही मला वाचवण्यासाठी प्रभुंनीच बिभीषणाला माध्यम बनवलं !

आश्चर्याची गोष्ट तर अशी, की रावणाने हनुमानाला शिक्षा म्हणून त्यांच्या शेपटीला आग लावावी असा आदेश दिला. त्यासाठी शेपटीला कपडे गुंडाळून तेल टाकून आग लावण्याचं ठरलं. म्हणजे लंकेला आग लावण्याचा हा प्रबंधही प्रभूने रावणाकडूनच करुन घेतला. आता इथे सुध्दा हा भ्रम निघून गेला, की मी नसतो तर काय झालं असतं !

मित्रांनो, कधीकधी एखादं मोठं कार्य आपल्या हातून घडतं तेव्हा आपल्यालाही असाच भ्रम होतो, हो ना ? परंतु त्यावेळी आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे, की जे जे उत्तम उदात्त घडतं ते ईश्वरकृपेनेच घडत असतं, आपण फक्त निमित्तमात्र असतो. जर प्रभू एका खारुताईकडून सेवा करुन घेत असतील तर ते कोणाकडूनही करुन घेऊ शकतात.

ना मी श्रेष्ठ आहे, ना मी खास आहे
मी तर प्रभूच्या चरणाचा दास आहे

अशीच भावना भक्तांची असते. ❖

## • नवीन सदस्यता सॉफ्टवेअरच्या संदर्भात वाचकांना नम्र विनंती •


सर्व भाषिक निरंकारी पत्रिका - **संत निरंकारी, एक नजर तसेच हसती दुनिया** या पत्रिकांच्या वाचकांसाठी नवीन सदस्यता सॉफ्टवेअरमध्ये सदस्यांची व्यक्तिगत माहिती अद्ययावत (अपडेट) केली जात आहे. नवीन सॉफ्टवेअर सेवेसाठी उपलब्ध होईपर्यंत नवीन सदस्य नोंदणी स्थगित केलेली आहे.

नवीन सदस्यता सॉफ्टवेअर मध्ये सदस्याची योग्य माहिती भरण्यासाठी एक **सदस्यता अपडेशन फॉर्म** बनवलेला आहे.

तरी **ज्या वाचकांना सध्या पत्र-पत्रिका व्यक्तिगत रुपात प्राप्त होत आहेत,** त्यांना नम्र विनंती आहे, की त्यांनी आपली व्यक्तिगत माहिती अपडेशन फॉर्म प्रमाणे जवळच्या ब्रांचला आवश्यक रुपात देण्याची कृपा करावी. हा अपडेशन फॉर्म आपण patrika.help@nirankari.org या ईमेल आयडी वरुन मागवू शकता. कृपया आपला मोबाईल/ व्हॉट्स ॲप नंबर अवश्य लिहावा.

- प्रभारी, पत्रिका-प्रकाशन विभाग

# सुब्रह्मण्यम चंद्रशेखर
## (१९१०-१९९५)



चंद्रशेखर सुब्रह्मण्यम यांचा जन्म लाहोर (पाकिस्तान) येथे झाला. पुढे त्यांचे कुटुंब चेन्नई येथे स्थलांतरित झाले. त्यांचे माध्यमिक शिक्षण चेन्नई येथील हिंदू हायस्कूलमध्ये तर महाविद्यालयीन शिक्षण प्रेसिडेन्सी महाविद्यालयात झाले. प्रसिध्द भारतीय शास्त्रज्ञ सर सी.व्ही.रमण हे चंद्रशेखर यांचे काका होते. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी पहिला शोधनिबंध लिहिला. विसाव्या वर्षी त्यांनी भौतिकशास्त्र विषय घेऊन बी.एस्सी. पदवी प्राप्त केली.

त्यांना केंब्रिज विद्यापीठात शिकण्यासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती प्राप्त झाली. भारतातून इंग्लंडपर्यंत प्रवास करताना त्यांनी श्वेत बटू ताऱ्याबाबत महत्त्वाचे संशोधन केले. त्यांनी केंब्रिजमधील ट्रिनिटी कॉलेजमध्ये आपले पुढील शिक्षण घेतले. चंद्रशेखर यांना वयाच्या २३ व्या वर्षी केंब्रिज विद्यापीठाकडून पीएच्.डी. पदवी प्रदान करण्यात आली. पुढच्या काळात त्यांनी शिकागो विद्यापीठात, सहयोगी प्राध्यापक म्हणून काम केले. अवघा दोन वर्षांनी त्यांना प्राध्यापक म्हणून बढती मिळाली तेव्हा ते केवळ ३३ वर्षांचे होते. नंतरच्या काळात त्यांना अनेक विद्यापीठांकडून मानाची पदे देऊ करण्यात आली; परंतु त्यांनी ती नाकारली आणि ते शिकागो विद्यापीठातच कार्यरत राहिले.

१९५३ साली त्यांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले.

चंद्रशेखर यांचे सर्वात नावाजलेले संशोधन हे श्वेत बटू (White Dwarf) ताऱ्यांबाबतचे होते. श्वेत बटू ही सूर्यासारख्या आकारमानाने लहान असणाऱ्या ताऱ्यांची शेवटची अवस्था असते. ताऱ्यामधील हायड्रोजनचे हेलियममध्ये अणू संमीलन (Fusion) झाल्यानंतर हेलियममध्ये अणू-संमीलनाची क्रिया सुरु होते. जेव्हा हेलियमचे सर्व अणू संपतात तेव्हा तारा आकुंचन पावून त्याचा श्वेत बटू होतो. श्वेत बटू ताऱ्याचे सर्वाधिक वस्तूमान सूर्याच्या वस्तुमानाच्या १.४४ पट एवढे असते, हे त्यांनी सैध्दांतिक पध्दतीने दाखवून दिले होते. एखाद्या ताऱ्याचे वस्तुमान वरील मर्यादेच्या आत असेल तर त्या ताऱ्याच्या मृत्यूनंतर त्याचे श्वेत बटूमध्ये रुपांतर होते. या मर्यादेला चंद्रशेखर मर्यादा असे म्हणतात. ज्या ताऱ्याचे वस्तुमान या मर्यादेपेक्षा अधिक असेल त्याचे रुपांतर न्यूट्रॉन ताऱ्यामध्ये किंवा कृष्णविवरामध्ये होते.

उर्वरित पान क्र. ९ वर



# अहंकाराचा नाश

एका गावात किसन आणि भैरव नावाचे दोन शेतकरी शेजारी राहत होते; परंतु दोघांचे स्वभाव मात्र अतिशय भिन्न होते. किसन खूप परोपकारी आणि दयाळू होता. त्याला इतरांना मदत करायला आवडत असे. याउलट भैरव अत्यंत रागीट आणि भांडखोर स्वभावाचा होता. त्याच्या या स्वभावामुळे गावात त्याला कोणीही चांगले म्हणत नसे. इतरांची उणी-दुणी काढून भांडण उकरुन काढण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे गावातील लोकही त्याला वैतागले होते.

भैरव किसनसारख्या सज्जन शेजाऱ्याला तर खूपच त्रास देत असे. एकदा त्याने किसनच्या शेतात आपले बैल सोडले, बैलांनी त्याच्या शेताची नासधूस केली. तरीही किसनने कुठल्याही प्रकारे त्रागा केला नाही. एकदा तर भैरवने किसनच्या शेतातील पाण्याचा हौदच तोडून टाकला.

एवढं नुकसान करुन देखील किसन भैरवला अवाक्षरही बोलला नाही. किसनशी भांडायची संधी न मिळाल्याने भैरव स्वत:वरच चिडला होता.

असेच दिवसामागून दिवस जात होते. एके दिवशी भैरव एका गावातून आपल्या बैलगाडीत धान्याच्या गोणी घेऊन येत होता. अचानक मुसळधार पाऊस सुरु झाला. वाटेत एक ओहोळ लागला. ओहळात खूप चिखल झाला होता. त्यामुळे भैरवची गाडी चिखलात रुतून बसली. बैल अशक्त असल्यामुळे ते चिखलात रुतलेली गाडी

ओढू शकत नव्हते. सगळ्या गावात ही बातमी पसरली. गावातील लोक म्हणू लागले, भैरव खूप दुष्ट आहे, त्याला अशीच अद्दल घडली पाहिजे. बैलगाडी रात्रभर चिखलामध्ये पडून राहिली ना, मग त्याचं डोकं ठिकाणावर येईल.

ही बातमी जेव्हा किसनला समजली तेव्हा तो आपले तरणेबांड सशक्त बैल घेऊन ओहळाच्या दिशेने तातडीने निघाला. हे पाहून त्याचा मित्र माधव म्हणाला, "किसना, अरे भैरवने तुला इतका त्रास दिलाय, इतकं तुझ्याशी वैर धरलंय, मग कशासाठी तू त्याची मदत करतोस?" त्यावर किसन म्हणाला, "आज मी तेच संपवून टाकणार आहे."

किसन बैल घेऊन येत असल्याचे भैरवने पाहिले. तो तुच्छतेने म्हणाला, "किसना! तू तुझे बैल घेऊन परत जा. मला कोणाच्याही मदतीची गरज नाही, समजलं!"

हे ऐकून किसन म्हणाला, "भैरवा! तू मला कितीही वाईट बोललास तरी आता मात्र मी तुझं काहीही ऐकून घेणार नाही. कारण तुझी बैलगाडी चिखलात रुतून बसली आहे आणि काळोखही पडत चाललाय." असे म्हणून त्याने भैरवचे बैल मोकळे सोडले आणि त्याच्या गाडीला आपले बैल जुंपले. त्याचे बैल सशक्त असल्याने थोड्याच वेळात त्यांनी चिखलातील गाडी ओढून बाहेर काढली आणि भैरवला सुखरुप घरी पोचवले.

या घटनेमुळे भैरव मनातल्या मनात खूप शर्मिंदा झाला. त्या दिवसानंतर मात्र भैरवचा दुष्ट स्वभाव हळूहळू बदलत गेला. किसनच्या शांत, संयमी आणि परोपकारी स्वभावामुळे त्यांच्यातील वैरभावाचा नाश झाला. गावातील लोकांशीही तो प्रेमाने वागू लागला.

तात्पर्य : वैरभावाला प्रेमाने, अहंकाराला नम्रतेने आणि दुष्टपणाला परोपकाराने जिंकता येते. ❖

# सुब्रह्मण्यम चंद्रशेखर (१९१०-१९९५)

(पान ७ वरुन)

आपल्या दीर्घिकेच्या केंद्राभोवती फिरत असलेल्या ताऱ्यांचा त्यांनी अभ्यास केला आणि गतिज घर्षण ही नवीन संकल्पना मांडली. चंद्रशेखर यांनी एकूण ४५ विद्यार्थ्यांना पीएच्.डी.साठी मार्गदर्शन केले. त्यांच्या दोन विद्यार्थ्यांना पुढच्या काळात भौतिकशास्त्र या विषयात नोबेल पुरस्कार प्राप्त झाले. चंद्रशेखर यांनी सुमारे ३८० शोधलेख आणि ११ पुस्तके लिहिली आहेत.

ताऱ्यांच्या रचनेशी निगडीत प्रक्रिया आणि ताऱ्यांची उत्क्रांती या विषयावर केलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल १९८३ मध्ये चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्र या विषयातील नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले आहेत, भारत सरकारकडून त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अमेरिकेच्या नासा या संस्थेने अंतराळात सोडलेल्या ४ भव्य वेधशाळांपैकी एक वेधशाळेला चंद्रशेखर यांचे नाव देऊन त्यांचा गौरव केला आहे. चंद्रा एक्स रे टेलिस्कोप या नावाने ओळखली जाणारी वेधशाळा १९९९ मध्ये अंतराळात सोडण्यात आली असून ती आजही कार्यरत आहे. एका लघुग्रहाला चंद्रशेखर असे नाव देण्यात आले आहे. भारतातील हिमालयात हॅन्ले येथे उभारलेली एक दुर्बीण हिमालयन चंद्रा टेलिस्कोप या नावाने ओळखली जाते. ❖



विचारपुष्प

# ईश्वराची जाणीव सदोदित असावी

ब्रह्मज्ञान ही भक्तीची पहिली पायरी आहे, तर ते जीवनामध्ये उतरवणे ही दुसरी पायरी आहे. ज्याप्रमाणे एखाद्या पक्ष्याचे दोन पंख असतात. उडण्यासाठी त्याला दोन्ही पंखांची आवश्यकता असते.त्याप्रमाणे जीवन जगताना ब्रह्मज्ञान कर्मामध्ये उतरवणं आवश्यक असतं. त्यामुळे आपलं मन स्वच्छ आणि पवित्र राहतं. इतरांनाही सुख शांती देणारं होतं. ही सजगता ईश्वराने आपल्या सर्वांना दिलेली आहे. तेव्हा प्रेम, करुणा, विनम्रता आणि विशालता यांसारखे गुण धारण करुन आपण जीवन सुंदर बनवू शकतो. सत्संगामध्ये हीच शिकवण मिळते, की सर्वांचा आदर सत्कार करावा. प्रत्येकामध्ये हा ईश्वर आत्मारुपाने उपस्थित आहे. जरी काही कारणाने

दुरावा निर्माण झाला, तरी विशाल अंत:करणाने सामंजस्याने तो दुरावा मिटवावा. तसेच आपल्याला एखादी शिकवण कोणाकडूनही मिळो मग तो भले लहान बालक असो किंवा वयोवृध्द असो, एखादी वस्तू असो किंवा एखादी कथा असो, आपण शिकतच राहावं. आपल्या मनात असा भाव कधीच येऊ नये, की शिकवणारा कोण आहे ? त्याचं जीवन कसं आहे ? याऐवजी तो काय शिकवण देत आहे याकडे लक्ष द्यावं. आपल्याला मिशनची शिकवण मनामध्ये इतकी दृढ रुजवायची आहे, जेणेकरुन आपल्याला इतरांमध्येही जागृती निर्माण करता येईल. आपल्याला चालता-फिरता प्रचार बनायचं आहे. शब्दांच्याद्वारे काही सांगण्यापेक्षा आपल्या वागणुकीतून, आचरणातून तो गुण दिसावा. शब्दापेक्षा कृतीतून चित्र जास्त स्पष्ट होत असतं.

आपण या निराकार ईश्वरासाठी काहीच करु शकत नाही. कारण आपल्याला या ईश्वरानेच तर बनवलेलं आहे. म्हणून पहिल्या प्रणामध्ये सांगितल्याप्रमाणे तन-मन-धन निराकार प्रभूची देण आहे. मग त्याचा अभिमान का बरं करावा ? सत्संगामध्ये येऊन मर्यादेत राहून जीवन जगायचं आहे.

अनेकदा आपण सद्‌गुरुसमोर, संत महापुरुषांच्या समोर आपलं वागणं, बोलणं, चालणं मर्यादेमध्ये ठेवतो; परंतु घरामध्ये किंवा समाजात वावरत असताना हे विसरुन जातो, की हा निराकार प्रभू आपल्याला प्रत्येक क्षणी पाहत आहे. सद्‌गुरुसमोर किंवा संत-महापुरुषांच्या समोर आपण जसं वागतो, तो आपला स्वभाव बनायला हवा.

ब्रह्मज्ञान घेऊनही जर आपण दुसऱ्याचं मन दुखावत असू, आपल्या बोलण्यामुळे दुसऱ्याच्या डोळ्यात अश्रू येत असतील तर याचा अर्थ आपल्याला ज्ञान समजलेलं नाही किंवा समजलेलं असूनही आपण डोळेझाक करत आहोत. आपण मनुष्य देह धारण केला, म्हणून माणूस बनलो असं होत नाही. त्यासाठी मानवी मूल्ये जीवनात धारण करावीत. तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने मानव बनू शकतो. एखाद्या वेळी रागाच्या भरात आपण कोणाला काही कटू शब्द बोलून मन दुखावलं तर त्यात आपलंही नुकसान आहे आणि त्याचंही नुकसान आहे. कारण कटू बोलण्याने नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. ती व्यक्ती आपल्याशी आयुष्यभर बोलत नसते. आपले कटू शब्द तिच्या मनात घर करुन बसतात. आपल्या मुखावाटे निघालेल्या अशा शब्दांनी आपल्याही मनाची शांती भंग होते. म्हणून प्रत्येक क्षणी या ईश्वराची जाणीव राहावी. तरच जीवनात शांती-समाधान कायम टिकून राहील. ❖

ब्रह्मज्ञान घेऊनही जर आपण दुसऱ्याचं मन दुखावत असू, आपल्या बोलण्यामुळे दुसऱ्याच्या डोळ्यात अश्रू येत असतील तर याचा अर्थ आपल्याला ज्ञान समजलेलं नाही किंवा समजलेलं असूनही आपण डोळेझाक करत आहोत. आपण मनुष्य देह धारण केला, म्हणून माणूस बनलो असं होत नाही. त्यासाठी मानवी मूल्ये जीवनात धारण करावीत. तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने मानव बनू शकतो.

# आपली खादय संस्कृती

रोज रोज आणावी ताजी भाजी, नेहमीच म्हणते माझी आजी
आरोग्यासाठी नियमित खावी, हंगामा मधील नवनवीन भाजी

कांद्याची पात अन् पिठलं भाकर, कोशिंबीरीत खावे काकडी गाजर
वांग्याचे भरीत भलतेच चटकदार, भोजनानंतर प्यावे, ताक थंडगार

मेथी माठ पालक, चवळी छान, केळफूल तांदुळका, अळूचं पान
हिरव्या पालेभाज्यांचं महत्व फार, जीवनसत्व खनिजांचं मोठ्ठं आगार

वरण भाताला हवी लिंबाची साथ, साजूक तुपाची काही औरच बात
सार अन् कढीसोबत मसाले भात, सुग्रास भोजनावर मारा आडवा हात

न्याहारीमध्ये घेऊ पोहे अन शिरा, थालीपीठ इडली सांबारच बरा
फ्रूटसलाडमध्ये घेऊ, मोसमी फळे, आजारपण थकवा, दूर दूर पळे

कशाला हवाय बर्गर पिझ्झा... ?, भारतीय पदार्थांची घेऊ या मज्जा
खाद्यसंस्कृतीची आपल्या वाढवू शान, सुदृढ आणि निरोगी राहू सारे छान

- रश्मी थोरात (बोरिवली)

# दादाला विचारू या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्‌गुरु बाबाजींचे

प्रश्न : मनात निर्माण होणाऱ्या आशा-तृष्णा-लालसा दूर कशा होतील ?

उत्तर : मनामध्ये निराकार प्रभू परमात्म्याला स्थान दिलं तर मनात कधीही आशा, तृष्णा, लालसा जागृत होत नाहीत. समाधानी वृत्ती बनते. मनात प्रभूविषयी कृतज्ञतेचा भाव निर्माण होतो.

❍❍❍❍

प्रश्न : खरा धर्म कोणता ?

उत्तर : प्रभू परमात्म्याला हृदयात स्थान देणं, सर्वत्र प्रभू परमात्म्याला पाहणं, समस्त प्राणिमात्रावर प्रेम करणं, माणुसकी बाळगणं हाच खरा धर्म आहे. धर्म सदैव इतरांना प्रकाश देतो. धर्म जीवन जगणं शिकवतो, हृदय विशाल करायला शिकवतो. जिथे धर्म नाही तिथे स्वार्थ असतो, तिथे लालसा निर्माण होतात. जेव्हा माणसाला खोट्या मोठेपणाची इच्छा निर्माण होते, तेव्हा ती पूर्ण करण्यासाठी मनुष्य धर्मांचा दाखला देऊन माणसा माणसात भेदभाव वाढवतो आणि शेवटी तो अपयशी ठरतो. ज्याला तो धर्म समजत असतो तो मात्र धर्म नसून अधर्म असतो.

❍❍❍❍

प्रश्न: धन-दौलत अंतकाळी सोबत येत नाही असे म्हणणारे धनप्राप्तीसाठी धडपड करताना का दिसतात ?

उत्तर : धनदौलत प्राप्त करणे वाईट नाही. धनदौलत माणसाच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी आवश्यक आहे; परंतु धनदौलतीला मनात बसवून ठेवणे, सदैव धनप्राप्तीची इच्छा बाळगणे, धनाचं चिंतन करणे हे खूप मोठ्या दु:खाचं कारण आहे. जर समाधान नसेल तर धनाच्या लालसेने मानवाचं जीवन व्यर्थ जातं. म्हणून धनाची तृष्णा ही महापुरुषांसाठी देखील दु:खदायी ठरते.

❍❍❍❍

# शब्दकोडे २२३

○ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ४ | ५ |
| ६ | | | ७ | | ८ | |
| | | ९ | | | | |
| १० | ११ | | | | १२ | |
| | १३ | १४ | | १५ | | |
| १६ | | | | | | |
| | | | | | | १७ |
| १८ | | | | १९ | | |

## आडवे शब्द

३. विवाहित स्त्रीच्या वडिलांचे घर
६. जैन धर्माची स्थापना वर्धमान .... यांनी केली
८. फळांचा अर्क
९. जगातील सगळयात मोठे वाळवंट
१०. एक हजारात एकावर किती शून्य असतात?
१२. एक कडधान्य, पावटा
१३. सर्वात लहान दोन अंकी संख्येची दुप्पट
१५. ..... या वाद्यास मंगल वाद्य म्हणतात.
१६ नारदाचे गुरु
१८. मुसलमानांची प्रार्थना
१९. महाभारतातील सहदेवाचा भाऊ

## उभे शब्द

१. पुराणातील नल राजाची पत्नी
२. संयुक्त राष्ट्र संघटना दिन ऑक्टोबरच्या.... तारखेला साजरा केला जातो.
४. शत्रूच्या गटातील माहिती गुप्तपणे काढणारा
५. एक मिष्ठान्न (गोड पदार्थ)
७. पाणी काढण्यासाठी विहिरीवर बसवलेले जुने साधन
११. जुना याच्या विरुध्द
१२. प्रभू श्रीरामांची सेना, ........ सेना!
१४. ..... या नदीकिनारी लुधियाना शहर वसले आहे (सतलज/ गोदावरी)
१५. ब्रह्मज्ञानामुळे जीवनात काय प्राप्त होते? (समाधान/अधिकार)
१६. 'भारतरत्न' पुरस्कार प्राप्त करणारा पहिला खेळाडू : ..... तेंडुलकर
१७. भारताचे पहिले शीख राष्ट्रपती ज्ञानी ..... सिंग होते.

उत्तरे इतरत्र



# भारतीय वायुसेना दिवस

**भारतीय हवाईदलाबद्दल काही रोचक तथ्य -**

❑ भारतीय वायुसेना ही जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी आणि बलशाली वायुसेना मानली जाते. अमेरिका, चीन आणि रशिया यांच्यानंतर भारतीय वायुसेनेचा जगामध्ये नावलौकिक आहे.

❑ ८ ऑक्टोबर १९३२ मध्ये इंग्रजांनी भारतीय वायुसेनेची स्थापना केली. इ.स.१९४५ मध्ये वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एयर फोर्स करण्यात आले. भारत स्वतंत्र झाल्यावर मात्र नावातील रॉयल हा शब्द वगळण्यात आला.

❑ भारतीय हवाई दलाचे बोधवाक्य नभ: स्पृशं दीप्तम्। आहे, ज्याचा शाब्दिक अर्थ टच द स्काय विथ ग्लोरी आहे. हे बोधवाक्य भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायाच्या चोविसाव्या श्लोकातून घेतले आहे. भारताचे माजी राष्ट्रपती राधाकृष्णन् यांनी ते सुचवले होते.

❑ भारतीय हवाई दलात १४०० पेक्षा जास्त विमाने असून १,७०,००० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत.

❑ उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये-दिल्लीजवळ असलेले हिंडन एअर फोर्स स्टेशन हे संपूर्ण आशियातील सर्वात मोठे एअरबेस असून ते जगातील आठवे सर्वात मोठे स्टेशन आहे.

❑ अभियान रहाट अंतर्गत भारतीय वायुसेनेने उत्तराखंडच्या महापुरात अडकलेल्या सुमारे २०००० लोकांची सुटका केली होती. बचाव मोहिमेतील हा एक जागतिक विक्रम होता.

❑ भारतीय वायुसेना ही ऑपरेशन पुमलई, ऑपरेशन विजय, ऑपरेशन मेघदूत यांच्यासारख्या विविध राष्ट्रहिताच्या मोहिमांच्या केंद्रस्थानी होती. विशेषकरुन नैसर्गिक आपत्तीच्या काळात वायुसेना भारतीयांच्या मदतीस अग्रस्थानी असते.

❑ भारतीय वायुदल संयुक्त राष्ट्रांसोबत शांतता मोहिमेत सहभागी होऊन जागतिक शांती कायम ठेवण्यासाठी आणि मानवतावादी कार्यामध्ये भाग घेण्यासाठी पुढे असते.

❑ भारतीय हवाईदलात महिला लढाऊ वैमानिक, महिला नेव्हिगेटर आणि महिला अधिकारी यांचा उल्लेखनीय समावेश आहे. आयएएफच्या राफेल ताफ्यातही एक महिला लढाऊ वैमानिक आहे हे विशेष!

❑ यावर्षी भारतीय हवाईदल प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथे हवाईदल दिवस साजरा करणार आहे. यात विमानांच्या चित्तथरारक कवायती होतील. यात अत्याधुनिक राफेल, Su-30 आणि मिराज २००० ही लढाऊ विमाने सहभागी होणार आहेत. ऐंशी विमाने या फ्लायपास्टमध्ये सहभागी होतील. यावेळी या कार्यक्रमात हवाईदलाच्या जवानांच्या नव्या गणवेषाचे देखील अनावरण होणार आहे. ❖





# चित्रकथा



चित्रांकन व लेखन : अजय कालरा






एकदा तो कुठेतरी चालला होता. त्याला वाटेत काळ्या जांभळांनी लगडलेली झाडं दिसली. काळीभोर टपोरी जांभळं पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले.
त्या झाडावर पोपटांचा थवा आनंदाने जांभळं खाताना त्याला दिसला.
ससा त्यांना म्हणाला, माझ्या प्रिय नातवांनो, थोडीशी जांभळं मलादेखील द्या.
त्या पोपटांमध्ये मिठू नावाचा एक पोपट फारच खोडकर होता.
तो म्हणाला, आजोबा, तुम्ही गरम जांभळं खाणार की थंड ?


म्हातारा ससा हैराण झाला. तो म्हणाला, वेड्यांनो, जांभळं कधी थंड किंवा गरम असतात का? माझी चेष्टा करु नका. चला, माझ्यासाठी थोडी जांभळं तोडून खाली टाका.
अहो आजोबा, तुम्ही विद्वान असूनही तुम्हाला एवढंदेखील ठाऊक नाही की, जांभळं थंड आणि गरम असतात. आधी तुम्ही सांगा तुम्हाला कुठली जांभळं हवीत? त्याशिवाय आम्ही तुम्हाला कशी देणार?
म्हातारा ससा विद्वान असूनही ही गोष्ट समजू शकला नाही, की खरंच जांभळं गरमही असतात? त्याचं रहस्य काय आहे हे जाणून घेण्यासाठी तो म्हणाला -
बेटा, तू मला गरम जांभळं दे. थंड जांभळं मी खूप खाल्लेली आहेत.


छोट्या मिठूने मग एक फांदी जोराने हलवली. त्याबरोबर खूपशी जांभळं खाली धुळीत पडली. म्हातारा ससा ती धुळीत पडलेली जांभळं फुंकून फुंकून खाऊ लागला.
ससा म्हणाला, बेटा, ही तर थंड जांभळं आहेत.
मग तुम्ही ती फुंकून फुंकून का खात आहात ? अशा तऱ्हेने तर गरम पदार्थच आपण खातो.
छोट्या मिठूच्या बोलण्यातली खुबी सशाच्या लक्षात आली. तो शर्मिंदा झाला आणि त्याचा अभिमान गळून पडला.

विशेष

# डिप्रेशन (मानसिक तणाव) आणि उपाय



स्पर्धेच्या या युगात डिप्रेशनच्या समस्येने भयंकर रुप धारण केले आहे. डिप्रेशन ही फक्त प्रौढांचीच समस्या राहिली नाही. तरुण, लहान मुले ही सुध्दा डिप्रेशनची शिकार होत आहेत. त्यामुळे भविष्यात डिप्रेशन ही मोठी समस्या बनू शकते.

डिप्रेशन म्हणजे मनावर येणारा अतिताण. डिप्रेशनची अनेक लक्षणे (Symptoms) दिसून येतात, ती अशी -

- सतत उदास किंवा निराश वाटणे.
- कधी कधी अचानक चिडचिड होणे.
- नवीन व्यक्तींची व नवीन ठिकाणांची विनाकारण भिती वाटणे.
- एखाद्या गोष्टीची आवड अचानक कमी होणे.
- आपल्या दैनंदिन कामकाजात मन न लागणे.
- थकवा किंवा अशक्तपणा जाणवणे.
- भूक कमी लागणे किंवा अति प्रमाणात भूक लागणे.
- एखाद्या गोष्टीची विनाकारण काळजी लागून राहणे.
- स्वत: दोषी असल्यासारखे वाटणे.
- स्वत:ला काही इजा करावीशी वाटणे किंवा आत्महत्त्या करावी वाटणे.
- कारण नसताना पचनाच्या समस्या जाणवणे.
- जन्म घेऊन आपण काहीच करु शकलो नाही अशी खंत वाटत राहणे.
- जवळच्या व्यक्तींशी किंवा कुटुंबियांशी संवाद कमी होणे.
- आपले हसू होईल या भितीने कमी बोलणे किंवा अतिशय हळू आवाजात बोलणे.
- कधी कधी अचानक हसू किंवा रडू येणे.

गरिबी, बेरोजगारी, व्यसन, प्रेमभंग, अतिप्रिय व्यक्तीचा अचानक मृत्यू, एखादा मानसिक धक्का, कायम अपयश, शारीरिक आजार यामुळे डिप्रेशनच्या समस्येचा धोका कैक पटींनी वाढतो. डिप्रेशनमुळे इतर समस्या देखील उद्‌भवतात. जसे - भित्रेपणा, चिडचिड होणे, उदास वाटणे, रक्तदाब, मधुमेह, वजन वाढणे किंवा कमी होणे.

**डिप्रेशनवरील उपाय :-**

- नियमितपणे ६ ते ८ तास झोप घ्यावी.
- रोज किमान ३० मिनिटे व्यायाम करावा.
- योगासन व प्राणायाम करावे.
- एखादा छंद किंवा आवड जोपासावी. जसे, गायन, वादन, नृत्य, चित्रकला, हस्तकला इ.
- स्वत:साठी खास वेळ द्यावा.
- आपले विचार सर्वांसोबत शेअर करावे.
- अधूनमधून मित्र मैत्रिणींसोबत आवडीच्या ठिकाणांना भेटी द्याव्यात.
- आपली प्रत्येक कृती सकारात्मक असावी. सकारात्मक लोकांमध्येच राहावे.
- रिकाम्या वेळेत वाचन करावे, करमणुकीचे कार्यक्रम पाहावेत.
- स्वत:ला कधीही कमी समजू नका किंवा कोणाशी आपली तुलना करु नये.
- अध्यात्माची आवड असेल तर सत्संग व नामस्मरण करावे. ❖

# पुत्राचा भ्रम दूर झाला

संत एकनाथांचा पुत्र हरि हा संस्कृत भाषेचा खूप मोठा पंडित होता. त्याला आपल्या विद्वत्तेचा गर्व होता. आपले बाबा खालच्या जातीतील लोकांकडे जातात. त्यांच्या पंक्तिला बसून भोजन करतात. संस्कृत भाषेऐवजी मराठी भाषेमध्ये प्रवचन-लेखन करतात. या गोष्टी त्याला आवडत नव्हत्या. म्हणून तो एकदा घर सोडून काशीला निघून गेला. त्याच्या जाण्याने गिरीजाबाई खूप दु:खी झाल्या. तेव्हा नाथांनी त्याची समजूत घालत त्याला घरी आणलं. हरिपंडिताने घातलेल्या सर्व अटी मान्य केल्या.



नेहमीप्रमाणे नाथांच्या वाड्यावर नाथबाबांचं प्रवचन ऐकायला लोक जमले होते. नाथबाबा म्हणाले, "लोकहो, आज हरिपंडित काशीहून आलेला आहे. त्याने खूप विद्वत्ता प्राप्त केलेली आहे. आज माझा हरिपंडित प्रवचन करणार आहे." लोकांनी टाळ्या वाजवल्या. हरिपंडिताने मोठमोठे शब्द वापरुन प्रवचन केलं; परंतु ते सारं लोकांच्या डोक्यावरुन गेलं. लोकांच्या हृदयाला भिडतील, त्यांच्या दु:खावर फुंकर घालतील, त्यांना आधार देतील असे शब्द त्यांना ऐकायला मिळाले नव्हते म्हणून सारे हिरमुसले होते. दुसऱ्या दिवशी पुन्हा किर्तनाला लोक आले. पुन्हा त्यांची निराशा झाली. हळूहळू गर्दी कमी होऊ लागली. एके दिवशी राणू महार नाथांना म्हणाला, "महाराज! तुम्ही आपलं बुरगुंड केव्हा ऐकवणार?" ग्रामीण भाषेतील भारुडातून नाथ त्यांना खूप काही शिकवत; पण अलीकडे ते त्यांना ऐकायला मिळत नव्हतं.

एके दिवशी एक आजीबाई आल्या, त्या म्हणाल्या, "नाथबाबा एक इच्छा होती, ती पूर्ण करावी. मला सहस्त्रभोजन (हजार ब्राह्मणांना भोजन) घालायची खूप इच्छा आहे; पण सहस्त्र ब्राह्मण कुठून आणणार? म्हणून तुमच्यासारख्या सत्पात्री जीवाला भोजन घालून सहस्त्रभोजनाचं पुण्य मिळवावं असं वाटतं. त्यावर नाथबाबा म्हणाले, "आजीबाई, मी आलो असतो; परंतु कोणाकडे जायचं नाही, भोजन करायचं नाही असं वचन मी हरिपंडिताला दिलंय." त्यावर हरिपंडित म्हणाला, "आजीबाई, एका अटीवर बाबा तुमच्या घरी येतील." "आजीबाई म्हणाल्या, तुझ्या सगळ्या अटी मला मान्य आहेत; पण नाथांचे पाय लागू देत माझ्या घराला!"

हरिपंडित म्हणाला, "मी स्वत: स्वयंपाक करुन बाबांना वाढीन." आजीबाईंनी ते मान्य केलं. दुसऱ्या दिवशी आजीबाईंच्या घरी जाऊन हरिपंडिताने स्वयंपाक करुन नाथांना वाढलं. त्यांचं जेवण झाल्यावर स्वत:च त्यांची उष्टी पत्रावळ उचलली, तर काय आश्चर्य! एका पत्रावळीखाली दुसरी पत्रावळ. त्याच्याखाली तिसरी, चौथी, पाचवी अशा एक हजार पत्रावळी निघाल्या. एक ब्रह्मज्ञानी संताला भोजन घातल्यावर हजारो ब्राह्मणांना भोजन घातल्याचं पुण्य आजीबाईंना नाथांमुळे मिळालं होतं. तेव्हा हरिपंडिताला कळलं, की आपले वडील किती थोर आहेत! त्यांचा भक्तिमधील अधिकार किती मोठा आहे. त्याने नाथांची क्षमा मागितली आणि आपल्या पांडित्याचा कधीही अभिमान केला नाही. ❖



# जसा विचार, तसा परिणाम

एक व्यापारी होता. तो एका गावातून दुसऱ्या गावात व्यापारासाठी जात असे. एके दिवशी व्यापार करण्यासाठी जात असताना वाटेत त्याला एक गाव लागले. गावात शुकशुकाट होता. दुष्काळामुळे लोक घरदार सोडून मोलमजुरीसाठी इतर ठिकाणी गेले होते. गावातील तलाव, विहिरी आटल्या होत्या.

व्यापाऱ्याचा जीव तहान भुकेने व्याकूळ झाला होता. विश्रांतीसाठी तो एका मोठ्या झाडाखाली बसला. या दुष्काळग्रस्त गावात एवढा डेरेदार वृक्ष कसा ? याचं त्याला क्षणभर आश्चर्यही वाटलं.

बरंच अंतर चालून आल्यामुळे तो खूप थकला होता. त्यामुळे जमिनीवर अंग टाकताच त्याला झोप लागली. थोड्या वेळाने त्याला जाग आली. तेव्हा त्याच्या मनात विचार आला, की आता काहीतरी खायला मिळालं तर किती बरं होईल!... आणि काय आश्चर्य! त्याच्या समोर पंचपक्वान्नांनी भरलेलं ताट आलं. तो पोटभर जेवला. जेवून झाल्यावर त्याला लहान लागली. त्याच्या मनात विचार आला, की आता मला पाणी मिळालं तर किती बरं होईल!... लगेच त्याच्यासमोर थंड पाण्याने भरलेला लोटा आला. पाणी पिऊन तो अगदी तृप्त झाला.

त्याला एक गोष्ट जाणवली, की हा वृक्ष काही साधारण वृक्ष नाही. हा इच्छापूर्ती करणारा कल्पवृक्ष असावा. तेव्हा त्याने विचार केला, की या गावात दुष्काळ आहे, पाऊस पडलेला नाही. तेव्हा या गावातील सगळे तलाव, विहिरी पाण्याने भरु दे. दुष्काळ नाहिसा होऊन पुन्हा एकदा सुख-समृध्दी या गावात नांदू दे.

थोड्याच वेळात गावातील तलाव, विहिरी पाण्याने भरुन गेल्या. ही बातमी कळताच लोक आपल्या

उर्वरित पान क्र. २४ वर

कथा



# सुधारणा स्वत:पासून

एकदा दिनूचे आजोबा एकटेच शांत बसलेले होते. त्यांना उदास बसलेले पाहून दिनूने विचारलं, "काय झालं आजोबा, आज एवढं उदासपणे कसला विचार करत आहात?"

"काही नाही रे बाळा, मी माझ्या आयुष्याचा विचार करत होतो." आजोबा म्हणाले.

"आजोबा, मलाही सांगा ना तुमच्या जीवनाबद्दल..." दिनूने आग्रह केला.

आजोबा थोडा वेळ विचार करत राहिले आणि नंतर म्हणाले, "मी लहान होतो ना, तेव्हा माझ्यावर कोणतीही जबाबदारी नव्हती. तेव्हा मी असा विचार करायचो, की आपण सारं जगच बदलून टाकू या. सगळ्यांनी आपल्यासारखंच वागायला पाहिजे असं वाटायचं; पण जेव्हा मी थोडा मोठा झालो, तेव्हा लक्षात आलं, की जग बदलणं खूपच अवघड आहे. म्हणून मग मी विचार केला, की आपण जग नाही तर आपला देश बदलू या; परंतु जसजसा मी मोठा होत गेलो तेव्हा मला जाणवलं, की देश बदलणं ही पण काही सोप्पी गोष्ट नाहीये. मग पुढे माझं लग्न झालं. मुलंबाळं झाली. तेव्हा असं वाटू लागलं, की आपण फक्त आपल्या कुटुंबातील लोकांना बदलू या; पण मला तेही करता आलं नाही रे राजा! आता तर मी या जगात थोड्या दिवसांचाच पाहुणा आहे. आता मला जाणवतं, की मी जर स्वत:लाच बदलण्याचा विचार केला असता, तर ते मी नक्कीच करु शकलो असतो आणि कदाचित मला पाहून माझं कुटुंबही बदललं असतं... आणि पुढे जाऊन इतरांनाही त्यांच्यापासून प्रेरणा मिळाली असती."

हे सांगताना आजोबांचे डोळे पाणावले. ते दिनूला प्रेमाने जवळ घेत म्हणाले, "बाळा! माझ्यासारखी चूक तू मात्र करु नकोस हं. कोणी बदलो ना बदलो; पण स्वत:ला मात्र बदल हं. बाकी सारं काही आपोआप बदलेल."

तात्पर्य : जग बदलण्याची ताकद सर्वांमध्ये आहे; पण त्याची सुरुवात स्वत:पासून केली पाहिजे. म्हणून थोर पुरुषांनी सांगितलंय, की सुधारणा ही स्वत:पासून व्हावी. ❖



# इस्त्रो-भारताच्या अवकाश संशोधनाची यशोगाथा

❑ भूमीवर उपग्रह तयार करुन ते अवकाशात सोडण्याची क्षमता असलेल्या मोजक्या देशात भारताचा समावेश आहे. यात अमेरिका, रशिया, फ्रान्स, जपान आणि चीन हे देश येतात. इस्त्रो (ISRO) म्हणजे भारतीय अंतराळ संशोधन संस्था.

❑ इस्त्रोने आतापर्यंत २१ वेगवेगळ्या देशांसाठी ७९ उपग्रह आणि आजपर्यंत १५० पेक्षा जास्त उपग्रह प्रक्षेपित केले आहेत.

❑ इस्त्रोचे वैज्ञानिक कमीत कमी खर्चात या मोहिमा राबवत आहेत. पहिल्या रॉकेटचे काही भाग तर सायकलवरुनही वाहून नेण्यात आले. १९८१ मध्ये ॲपल (APPLE) हा उपग्रह बैलगाडीवरुन वाहून नेण्यात आला होता.

❑ इस्त्रोची मंगळ मोहीम फक्त ४५० कोटी रुपयांची होती. एखाद्या इंग्रजी चित्रपटाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या खर्चापेक्षाही कमी खर्चाची होती.

❑ इस्त्रोने भारताचा आर्यभट्ट हा पहिला उपग्रह १९ एप्रिल १९७५ रोजी रशियाच्या मदतीने प्रक्षेपित केला होता.

❑ या प्रक्षेपकाच्या मदतीने भारताने रोहिणी हा पहिला स्वदेशी बनावटीचा उपग्रह १८ जुलै १९८० मध्ये यशस्वी प्रक्षेपित केला होता. या प्रकल्पाचे संचालक माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम होते.

❑ ANTRIX हा इस्त्रोचा व्यावसायिक विभाग आपले अंतराळ तंत्रज्ञान इतर देशांना व्यावसायिक कार्यासाठी देत असतो.

❑ २००८-०९ मध्ये, इस्त्रोने चांद्रयान-१ लॉंच केले, त्याचा खर्च फक्त ३५० कोटी रुपये होता. हा खर्च NASA पेक्षा ८-९ पटीने कमी होता.

❑ पहिल्याच प्रयत्नात मंगळावर पोचणारा भारत (इस्त्रो) हा एकमेव देश आहे. अमेरिका, चीन आणि रशिया अयशस्वी झाले.

❑ इस्त्रोने स्वत:चे नेव्हिगेशनल उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केले त्यालाच IRNSS GPS उपग्रह म्हणतात.

❑ इस्त्रोकडून सॅटेलाइट डेटा देखील खरेदी करता येतो. आपल्याला एचडी चित्रे इ. हवी असल्यास इस्त्रोकडून ती मिळवू शकतो. ❖

## जसा विचार, तसा परिणाम

(पान २२ वरुन)

घराकडे परतू लागले. आता इथं आपल्या मनात कुठले नकारात्मक विचार येऊ नयेत म्हणून व्यापाऱ्यानेही तिथून लगेच प्रस्थान केले.

अशाच प्रकारे आपलं मन हे देखील एखाद्या कल्पवृक्षासारखं आहे. आपण जसा विचार करतो, तसा त्याचा प्रभाव आपल्या जीवनावर पडत असतो. सकारात्मक विचार केला तर सकारात्मक गोष्टी घडतील. नकारात्मक विचार केला तर नकारात्मक गोष्टी घडतील. म्हणून सर्वांच्याच बाबतीत नेहमी सकारात्मक विचार करावा. म्हणजे आयुष्यात नेहमी सकारात्मक गोष्टी घडतील आणि आपलंही जीवन आनंदाने व्यतीत होईल. ❖

# आपलं मूळ स्वरुप जाणा



प्रभू परमात्म्याचं ज्ञान झाल्यावर माणसाच्या मनाची बेचैन अवस्था लगेच संपून जाते. अशांतीच्या जागी शांतता आणि समाधान निर्माण होते. जसं एखाद्याला आपल्या घराचा पत्ता माहीत आहे, मग तो जगात कुठेही फिरायला गेला तरी स्वत:च्या घरी येणारच. भले तो सकाळी येवो, दुपारी येवो, रात्री येवो त्याला चिंता नसते. कारण त्याला आपले स्वत:चं घर कुठे आहे हे माहीत असतं. अशा प्रकारे जो या जगात जन्माला येऊन आपल्या मूळ घराची, म्हणजे आपण जेथून आलो त्या परब्रह्माची ओळख करुन घेतो, आपलं मूळ स्वरुप जाणून घेतो तो या जगात कितीही वर्षे जगला तरी त्याला देह सोडल्यानंतर भरकटावे लागत नाही. ज्याने आपले मूळ स्वरुप असलेल्या या निराकार प्रभूला जाणलं त्याला मृत्यूचं देखील भय वाटत नाही आणि यमराज देखील त्याचं काही बिघडवू शकत नाही. ज्याप्रमाणे लहान मुलं एक खेळ खेळतात. काही मुलं पुढे पळतात तर काही त्यांच्या मागे असतात. एक मुलगा त्यांना पकडायला धावतो. खेळात मात्र एक होत असतं, पकडणारा मुलगा ज्याला स्पर्श करेल तो मुलगा बाद होईल; पण जर त्याने सीमारेषेला स्पर्श केला किंवा ती रेषा ओलांडली तर पकडणाऱ्या मुलाने जरी त्याला स्पर्श केला तरी तो बाद होत नाही. अशाच प्रकारे आपल्या जीवनातही आपण आपले लक्ष म्हणजेच ब्रह्मप्राप्ती प्राप्त केली, तर यमदूतही आपलं काही बिघडवू शकत नाही. कारण त्याच्या आत्म्याचं कल्याण झालेलं असतं. त्याला कायमस्वरुपी सहज अवस्था प्राप्त झालेली असते. अशा व्यक्तींच्या जीवनात पूर्ण शांती निर्माण होते. ते कधीही अशांत किंवा बेचैन राहत नाहीत. भौतिक जगात प्रत्येक जण कुठल्या ना कुठल्या गोष्टीवरुन भांडत असतात. याचं कारण आध्यात्मिकता नसणे, सत्याशी नातं न जुळणे हेच आहे. ज्याने या प्रभू परमात्म्याला हृदयात धारण केलं, त्याचा प्रत्येक क्षण आनंदात जातो. ❖


# वाढदिवसाच्या


सर्वेशा


ईशित्व


श्रेयांश


अश्मित


शुभनीत


अद्वित



लानिश


नमन


हितांश


सान्वी


यशश्री


राजवर्धन


स्वरा


शुभ्रा


अमोल


# हार्दिक शुभेच्छा



श्रीशा



सुमेर



अभेदिका




नचिकेत



प्राण



वंशिका



अनंत



सेहेजता



धैर्यशील



श्रीशा



भक्ती



शिप्रा



अवनीत



लिखित



स्वरुप




# पारोळ्याचा भुईकोट किल्ला

जहागीरदार हरी सदाशिव दामोदर यांनी इ.सन १७२७ मध्ये हा किल्ला बांधला. त्यावेळी किल्ल्याच्या परिसरात ५० घरांची पेंढारांची वस्ती होती. आजही हा भाग 'पेंढारपुरा' म्हणून ओळखला जातो. पेशव्यांचे सरदार नेवाळकरांच्या कारकिर्दीत पारोळा ही उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठी व्यापारी पेठ म्हणून नावारुपास आली. झाशीच्या राणीचे वास्तव्य काही काळ ह्या किल्ल्यात होते. राणीच्या माहेरचे वंशज आजही पारोळा गावात राहतात.

सन १८५९ मध्ये इंग्रजांनी पारोळा किल्ला व शहर ताब्यात घेतले. धन मिळवण्यासाठी किल्ल्याची बरीच मोडतोडही केली. ह्या घटनेचे भग्न अवशेष किल्ल्यात आजही शाबूत आहेत.

पारोळा बसस्थानकापासून केवळ दहाच मिनिटांच्या अंतरावर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पारोळा किल्ला स्थित आहे. किल्ल्याभोवती सध्या बाजारपेठ वसलेली आहे. पारोळा किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार उत्तराभिमुख आहे. ते पार केल्यावर आत



आणखी एक प्रवेशद्वार लागते. प्रवेशद्वाराच्या बाजूने किल्ल्याला दुहेरी तटबंदी आहे. आतल्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना पहारेकऱ्यांच्या देवड्या व समोरच मुख्य किल्लाही दिसतो. अन्य भुईकोट किल्ल्यांप्रमाणे या किल्ल्याची बांधणी रेखीव आहे. तो साधारण १६० मीटर लांब व १३० मीटर रुंद आहे.

किल्ल्याच्या मध्यभागी मुख्य किल्ला अर्थात बालेकिल्ला आहे. सध्या या ठिकाणची निगा पुरातत्त्व विभाग घेत असल्याने अनेक ठिकाणी पुनर्बांधणी दिसून येते. किल्ल्यात प्रवेश केल्यावर डाव्या बाजूने किल्ला पाहण्यास सुरुवात करावी. किल्ल्याच्या अनेक कमानी येथून पुढे दिसून येतात; परंतु त्यांची पडझड झालेली आहे. एका कमानीजवळ चौकोनी विहीर आहे. त्यात पावसाळ्यात बऱ्यापैकी पाणी साठते. आतील तटबंदीवर चढण्यासाठी पायऱ्याही आहेत. या पायऱ्यांनी वर गेल्यास पारोळा गावाचे दर्शन होते. पूर्वेकडच्या तटबंदीच्या बाहेरच्या बाजूस एक मोठा तलाव आहे. अशा प्रकारच्या पाणीसाठ्याची रचना बहुतांश भुईकोट किल्ल्यांना दिसून येते. या तलावात उतरण्यासाठी तटबंदीला दोन मार्गही आहेत. बालेकिल्ल्याच्या अलीकडे एक टुमदार घर नजरेस पडते. दारुगोळा ठेवण्यासाठी त्याचा वापर होत असावा. या घरात सूर्यप्रकाश व चंद्रप्रकाश पोचावा यासाठी झरोक्यांची व्यवस्थित रचना केलेली आहे. पूर्वेच्या तटबंदीशेजारी एक महादेवाचे मंदिर आहे. या मंदिराजवळ एक मोठे भुयार असून त्याचा वापर जुन्या काळापासून होत असे. विशेष म्हणजे, या भुयारातून घोडेस्वार आत जात असे; असे स्थानिक रहिवाशी सांगतात. या भुयाराचे दुसरे तोंड आठ किलोमीटरवरील नागेश्वर मंदिराजवळ निघते, असे म्हटले जाते. याच भुयाराचा वापर राणी लक्ष्मीबाईने पारोळ्यातून बाहेर पडण्यासाठी केला होता. महादेव मंदिराच्या पुढे किल्लेदाराच्या दुमजली वाड्यांचे अवशेष दिसून येतात. पूर्वेची तटबंदी संपते त्या ठिकाणी ध्वजस्तंभ आहे. या ठिकाणापासून पूर्ण बालेकिल्ला नजरेस पडतो. पारोळ्याच्या बालेकिल्ल्याला चार गोलाकार भव्य बुरुज आहेत. त्यांची उंची साधारणतः पंचवीस फूट असावी.

बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार बंद केल्यामुळे जवळच्या चोर दरवाजाने वर प्रवेश करावा लागतो. वर गेल्यावर पूर्ण किल्ल्याचे चहूबाजूंनी दर्शन घेता येते. दक्षिणेच्या तटबंदीला लागून तीन पडक्या घरांचे अवशेष दिसतात. किल्ल्याच्या कचेऱ्या याच ठिकाणी कार्यरत होत्या. कचेऱ्यांच्या भिंतीवर बाहेर पाहण्यासाठी जंग्यांची रचना केली आहे. अशाच जंग्या तटबंदीवरही दिसून येतात. बालेकिल्ल्यावरुन उतरण्यासाठी पश्चिमेकडे एक दरवाजा आहे. सध्या तो बंद आहे.

वास्तुशास्त्राचा एक उत्तम नमुना म्हणून या किल्ल्याकडे पाहता येते. पारोळ्याचा हा किल्ला जळगाव जिल्ह्यातील एक सुंदर ठिकाण आहे. या किल्ल्याच्या संरक्षणासाठी पूर्ण गावाला चारही बाजूंनी तटबंदी होती. या तटबंदीला सात दरवाजे होते. त्यातील दिल्ली दरवाजा हा पूर्वेकडील व मुख्य दरवाजा. अन्य दरवाजांची नावे धरणगाव दरवाजा, वंजारी दरवाजा, पीर दरवाजा व अंमळनेर दरवाजा अशी आहेत. पारोळा हे धुळे शहरापासून ३० व जळगावपासून सुमारे २५ कि.मी. अंतरावर आहे. या दोन्ही शहरांपासून पारोळ्याला येण्यासाठी बसेसची सुविधा उपलब्ध आहे. ❖

# हसा मुलांनो हसा





शिक्षिका : पिंकी सांग बरं, चंद्राचा जन्म पृथ्वीपासून झाला असं म्हणतात, मग पृथ्वी आणि चंद्र यांचं नातं काय असेल ?

पिंकी : बहीण-भावाचं.

शिक्षिका : ते कसं काय ?

पिंकी : कारण पृथ्वीला आपण धरती माता म्हणतो आणि चंद्राला चांदोमामा म्हणतो म्हणून !



डॉक्टर : बंड्या, तुझी जीभ दाखव बघू !

बंड्या : मी नाही दाखवणार.

डॉक्टर : अरे का नाही दाखवणार ?

बंड्या : आई म्हणते मोठ्या माणसांना जीभ दाखवायची नसते.



मनू : माणसांपेक्षा प्राणी हुशार असतात हे तू कशावरुन म्हणतोस ?

सोनू : हे बघ प्राण्यांच्या शर्यती बघायला हजारो माणसं गोळा होतात; पण माणसांच्या शर्यती बघायला एखादं कुत्र तरी येतं का ?



गजाभाऊ : (हमालास) हे दहा रुपये घे आणि ज्या डब्यात अजिबात गर्दी नसेल अशा डब्यात मला बसव.


हमाल : हे दहा रुपये तुम्हीच ठेवा ! ही गाडी सोडून मागची जी गाडी येईल ना, ती पकडा. एकदम रिकामी मिळेल.

गजाभाऊ : अरे वा ! बरं कोणती गाडी येईल आता ?

हमाल : मालगाडी




दादा : छोटू ! तू पिंट्याला दगड का मारलास ?
छोटू : तो मला चिडवत होता म्हणून...
दादा : अरे मग मला सांगायचं होतं ना !
छोटू : का ? तुझा नेम माझ्यापेक्षा चांगला आहे का ?



लीलाकाकू : (दुकानदाराला) एक किलो लाल मिरची द्या.
दुकानदार : (नोकराला) हरी मिरची देना एक किलो.
लीलाकाकू : अहो, मी लाल मिरची मागितली.
दुकानदार : हरी मिरची दे जल्दी ताई को !
लीलाकाकू : (संतापून) लाल... लाल.... मिरची द्या.
दुकानदार : ताई, डोकं शांत ठेवा. ओरडू नका. माझ्या नोकराचं नाव हरी आहे.



शिक्षिका : यमी, अगं काय हा होमवर्क केलाय ! अक्षर किती घाणेरडं काढलंय. उद्या तुझ्या बाबांना घेऊन ये बघू !
यमी : अय्या ! मॅडम तुम्हाला कसं कळलं माझ्या बाबांनी लिहिलंय म्हणून ?



ग्रंथपाल : काय हो बन्याभाऊ, तुम्ही नेहमी हेच पुस्तक वाचायला का घेऊन जाता ? फार आवडलं का तुम्हाला ?
बन्या : नाही हो, तसं काही नाहीये. या पुस्तकातलं एक अक्षर सुध्दा मी वाचत नाही. एकदा काय झालं. या पुस्तकात ना मला पाचशे रुपयाची नोट सापडली होती. म्हणून मी ते पुस्तक पुन: पुन्हा घेऊन पाहतो.





कथा

# यश टिकवता आले पाहिजे

बंगाल प्रांतात यशोहर नावाचं एक राज्य होतं. त्या राज्यात प्रतापादित्य नावाचा राजा राज्य करत होता. तो शक्तिशाली होता. त्याने हे राज्य नवीनच स्थापन केले होते. हळूहळू त्याच्या राज्याची भरभराट होत होती. त्यामुळे दिल्लीचा मुघल बादशहा जहांगीर याला ही गोष्ट खटकू लागली. प्रतापचे राज्य जिंकून घेण्यासाठी त्याने आपला पराक्रमी सरदार मानसिंह याला तीन लाख सैनिकांची प्रचंड फौज घेऊन आक्रमण करायला पाठवले. प्रताप आणि मानसिंह या दोघांच्या सेनेत भीषण युध्द सुरु झाले. प्रतापादित्यचे सैनिक पराक्रम गाजवत होते. त्यामुळे मुघल सैन्याची पीछेहाट होऊ लागली. मुघलांच्या तीन लाख सैनिकांपैकी पंच्याहत्तर हजार सैनिक या युध्दात मरण पावले; परंतु मानसिंहला यश मिळाले नाही. प्रतापादित्यला मिळालेल्या विजयामुळे जिकडे तिकडे त्याच्या नावाचा डंका वाजू लागला. त्यामुळे साहजिकच प्रतापला आपल्या शक्तीचा, वैभवाचा अहंकार झाला.

(पान ३४ वर)

# बापूजी



महात्मा गांधीजी आम्हा भारतीयांची शान
सर्वांना बापूजींचा वाटतो सार्थ अभिमान

मायभूमीला परकियांनी केले होते गुलाम
तिला स्वतंत्र करण्याचा विचार केला ठाम

परदेशी मालावर मग घातला बहिष्कार
स्वदेशी अन् खादीचाही केला पुरस्कार

केवळ सत्य-अहिंसेचा अंगीकारला स्वभाव
भारत छोडो आंदोलनाचा पडला मग प्रभाव

एकजूट करुन घेतला वसा स्वातंत्र्याचा
देशवासीयांसवे केला बिमोड पारतंत्र्याचा

जागवली हृदयी आमच्या देशभक्ती खरी
मिळवून दिली आम्हा हक्काची भाकरी

अथक प्रचार केला, कारावासही सोसला
तेव्हा कुठे आपला भारत देश स्वतंत्र झाला

- मनीषा साळुंखे (मीरा रोड)

कुतुहल

# आपल्याला पाच बोटे का असतात ?



उत्क्रांतीच्या प्रवाहात ज्या एखाद्या गुणधर्मामुळे विशिष्ट पर्यावरणात तग धरुन राहायला मदत होते व जीवन सुसह्य व्हायला त्या गुणधर्माचे जतन होतं. उदा. झाडाच्या फांदीवरची पकड घट्ट होण्यासाठी किंवा हातात पकडलेल्या वस्तूंवरची पकड घट्ट होण्यासाठी पाच बोटांची मदत होते. त्यामुळे यासाठी आवश्यक असणाऱ्या जनुकांचं संवर्धन झालं.

उत्क्रांती प्रवाहाप्रमाणे जनुकांची प्रणालीही याला जबाबदार आहे. प्रत्येक प्राण्याची सुरुवात एकमेव फलित पेशींपासून होत असते. प्रथम त्या पेशीचे विभाजन होऊन दोन पेशी जन्माला येतात व अशाच प्रकारे केवळ विभाजन होऊन पेशींच्या संख्येत वाढ होते. सर्व पेशी हुबेहुब एकसारख्या असतात. त्यानंतर विशिष्ट काळी या पेशींपासून वेगवेगळ्या अवयवांची सुरुवात होते. ती होण्यासाठी त्याला कारक असणारी जनुके कार्यान्वित होतात. त्यांना होमिओबॉक्स जीन्स असं म्हणतात. त्याच्या प्रभावापोटी गर्भामधील अवयवांकुराचं पाच भागांमध्ये विभाजन होतं. त्यातील काही भाग शरीराच्या पुढच्या भागातील अवयवांच्या निर्मितीच्या कामाला लागतात, तर इतर पाठीमागील अवयवांच्या निर्मितीचं काम करायला लागतात. त्या अवयवांकुरांचे असे पाच भाग होत असल्यामुळे हातापायांना फुटणाऱ्या बोटांच्या संख्येवरही मर्यादा येते. शिवाय अशी पाच बोटं त्यांच्यावर सोपवल्या जाणाऱ्या पकडीच्या कामासाठी पर्याप्त असल्यामुळे त्यांच्या संख्येत काही बदल करण्याचं प्रयोजनच निर्माण झालं नाही. जेव्हा कधी या जनुकांमध्ये होणाऱ्या उत्परिवर्तनापायी पाचहून अधिक बोटं तयार होतात त्यावेळी ते अतिरिक्त बोटं पाच पैकी कोणत्या तरी एका बोटाला जोडलेलंच राहतं. ह्रतिक रोशनच्या डावीकडच्या हातांच्या अंगठ्याकडे पहा म्हणजे याची खात्री पटेल. ❖

---

## यश टिकवता आले पाहिजे (पान ३२ वरुन)

तो मौजमस्ती आणि मनोरंजन यातच गुंग असे. एकदा त्याच्या दरबारात एक म्हातारी बाई आपली तक्रार मांडायला आली. त्यावेळी राजा प्रताप हा नशेमध्ये होता. त्याने म्हातारीची व्यथा तर ऐकून घेतलीच नाही, उलट आपल्या मनोरंजनात व्यत्यय आणल्याबद्दल म्हातारीचे मस्तक धडावेगळे करा असा आदेश दिला. बिचारी म्हातारी बाई गयावया करु लागली; परंतु राजाची बुध्दी भ्रष्ट झाली होती. तिच्या रडण्याची, किंचाळण्याची त्याने अजिबात पर्वा केली नाही. ही घटना वाऱ्यासारखी राज्यात पसरली. राजाच्या या क्रूर वागण्याचा लोकांना खूप राग आला. लोक आता राजाविरुध्द बोलू लागले. याचाच फायदा मानसिंहाने घेतला. त्याने प्रतापच्या राज्यातील काही सरदारांना आपल्याकडे वळवून घेतले तसेच यशोहर राज्यातील काही महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती मिळवली आणि एके दिवशी प्रतापादित्य बेसावध असतानाच त्याच्या राज्यावर आक्रमण केले. त्याचे राज्य जिंकून घेतले आणि प्रतापला साखळदंडाने बांधून तुरुंगात डांबले.

यशाची धुंदी विनाशाकडे घेऊन जाते. म्हणून संत महात्मा म्हणतात, की जसजसे यश कीर्ती वाढत जाते, तसतशी जिवनात विनम्रता यायला हवी. फळांनी डवरलेला वृक्ष जसा नेहमी झुकलेला असतो, तसं यश कीर्ती वाढत गेली, की ती टिकवून ठेवण्यासाठी माणसाने परोपकारी आणि विनम्र बनलं पाहिजे. अन्यथा नियतीचा न्याय हा कधी कोणाला चुकला नाही. ❖



# आनंदी जीवनाचं रहस्य



स्वामीजी अमेरिकेत झालेल्या सर्वधर्मपरिषदेसाठी गेले असताना बरेच विचारवंत, तत्ववेत्ते त्यांना भेटायला येत. त्या काळात अमेरिकेमध्ये इंगरसोल नावाचे प्रसिध्द विचारवंत आणि उदारमतवादी वक्ता होते. ते निधर्मी आणि मुक्त विचारांचे होते. धार्मिक किंवा आध्यात्मिक गोष्टींमध्ये त्यांना विशेष रुची नव्हती. त्यांचा ते उघडपणे विरोधही करत असत.

एकदा शिकागोमध्ये इंगरसोल आणि स्वामीजींची भेट झाली. त्यापूर्वीही दोन-तीन वेळा ते भेटले होते आणि त्यांच्यामध्ये अध्यात्म, धर्म, तत्त्वज्ञान या विषयांवरही चर्चा झाली होती.

या भेटीत इंगरसोल स्वामीजींना म्हणाले, "या जगात जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत सर्व सुखांचा जेवढा उपभोग घेता येईल तेवढा घेण्याचा मी प्रयत्न करतो. माझं तर असं मत आहे, की या जीवनरुपी संत्र्यातील थेंब न् थेंब पिळून त्याचा आस्वाद घेतला पाहिजे. कारण आपल्या आजूबाजूला असलेल्या जगाचा आपण काय भरोसा देऊ शकतो! या सुखाशिवाय बाकी सर्व काही व्यर्थ आहे."

त्यावर स्वामीजी म्हणाले, या जीवनरुपी संत्र्याचा आस्वाद घेण्याचा माझ्याकडे चांगला मार्ग आहे. त्यामुळे मला अधिकाधिक आनंद आणि सुख प्राप्त होत आहे. मला हे माहीत आहे, की एक ना एक दिवस मृत्यू येणार. माझा देह नाश पावला तरी माझा नाश होणार नाही. मी शाश्वत आहे. कायमस्वरुपी राहणारा आहे. त्यामुळे मला घाई गडबड करण्याची काही गरज वाटत नाही. मी कशाचंही भय बाळगत नाही. त्यामुळे या जीवनरुपी संत्र्याचा आनंद मी घेऊ शकतो. मी प्रत्येक व्यक्तीमध्ये साक्षात परमेश्वर आपल्यासमोर आहे हेच बघत असतो. प्रत्येक देहात ईश्वर विराजमान आहे. हे जाणल्यामुळे मला प्रेमाचा जो आनंद मिळतो त्याची क्षणभर जरी कल्पना केली, तरी हृदयात आनंदाचा झरा वाहू लागेल. आपल्यासमोर असलेलं जीवनरुपी संत्रं याच पध्दतीने पिळून पहा, हजारो पटीने आनंद मिळेल. या प्रेममय जीवनाचा खरा आस्वाद आपल्याला घेता येईल.

हे ऐकून इंगरसोल अंतर्मुख झाले, अशा प्रकारे स्वामीजींनी सहज सोप्या शब्दांमध्ये इंगरसोल-सारख्या निरीश्वरवादी विचारवंताला आनंदी जीवनाचं रहस्य समजावून सांगितलं, आनंदाचा राजमार्ग समजल्यामुळे इंगरसोल देखील स्वामीजींचे भक्त बनले.

❑ संग्राहक - सुकदेव पाटील



आरोग्याचा मंत्र

# बहुगुणकारी सफरचंद

पृथ्वीवरील सर्वात स्वादिष्ट आणि लोकप्रिय फळामधील एक फळ आहे सफरचंद. सफरचंदाच्या सेवनाने आपल्याला अनेक लाभ मिळतात. 'रोज एक सफरचंद खाऊ, डॉक्टरांपासून दूर राहू' ही म्हण प्रचलित झाली आहे.

**पाचनशक्ती सुधारते :-** सफरचंदात तंतूचे प्रमाण जास्त असल्याने पचनक्रियेसाठी ते महत्त्वाचे ठरते. रोज एक सफरचंद खाल्ल्याने पोटाचे विकार दूर होतात. चरबी वाढण्यास प्रतिबंध होतो. पाचनतंत्रातील बिघाड दूर होतात.

**कर्करोगात प्रभावी :-** कोणताही कर्करोग झाला असेल तर रोज सफरचंद खावे. कर्करोग थांबवण्याचे घटक सफरचंदात सर्वात जास्त आढळतात. फुफ्फुसाच्या कर्करोगात सफरचंद फारच प्रभावी ठरते.

**रोगप्रतिकारक शक्तीत वाढ :-** सफरचंदात भरपूर प्रमाणात लोह असल्याने ते लोहाची कमतरता भरुन काढते. रक्तातील लाल पेशींचे प्रमाण झपाट्याने वाढते. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**अशक्तपणा दूर होतो :-** दररोज एक सफरचंद खाल्ल्याने थकवा, अशक्तपणा दूर होतो. सफरचंदात असणारी प्रतिरोधके आणि प्रथिने शरीराला, विशेषतः हाडांना अधिक मजबूत बनवतात.

**मधुमेह नियंत्रित करण्यासाठी :-** सफरचंदामधील प्रतिरोधके, पोलीफिनॉल सरळपणे शरीरातील कार्बोद्कांच्या संपर्कात राहून रक्तातील शर्करा नियंत्रित करतात. त्यामुळे मधुमेहात ते लाभदायक ठरते.

**दातांसाठी :-** सफरचंदाचे सेवनाने दातांमधील कॅल्शियम वाढते आणि हिरड्या मजबूत बनतात. सफरचंदाच्या नियमित सेवनाने दातात कीड होत नाही. कारण त्यामधील प्रतिजैविक तत्व शरीरातील तसेच मुखातील हानिकारक जीवाणू आणि विषाणूंना दूर ठेवून शरीरातील लाळेचे प्रमाण संतुलित ठेवतात.

**श्वाससंबंधी समस्या :-** श्वासांच्या समस्यांमध्ये मुख्य असतो अस्थमा. त्याचा परिणाम कमी करण्यासाठी सफरचंद फारच प्रभावशाली ठरते. सफरचंदामध्ये बऱ्याच फळ आणि भाज्यांचे गुण सापडतात. सफरचंद हे एक स्वयंपूर्ण पोषकांचं भांडार आहे.

**हृदय विकारांवर :-** सफरचंद सेवनाने शरीरातील कोलेस्ट्रॉलची मात्रा कमी होते, शरीरातील रोग प्रतिकारक यंत्रणा कार्यान्वित होते. सफरचंदात सापडणाऱ्या लिपीड पेरोक्सिडेशन आणि इतर तंतू हृदयाला ताण देण्यापासून वाचवतात. यासोबत हृदयाचे नियोजन व्यवस्थित होते.

**वात :-** सफरचंदातील फ्लावोनाइड हे घटक कम्पर्फेरोल, क्युर्सेनटीन आणि मेरी सेटीन यांनी संपन्न असतात. त्यामुळे वाताच्या समस्या कमी होतात.

**डोळ्यांसाठी :-** सफरचंदमध्ये सापडणारे फ्लावोनाइड तत्व आणि प्रतिरोधक पोषके यांनी डोळे निरोगी राहतात. डोळ्यांपुढे अंधारी येणे, न दिसणे या समस्या दूर होतात. डोळ्यासंबंधी मैकुलर डीजरेशन, कटरेक्ट आणि ग्लुकोमात होणारे रोग यामुळे दूर करता येतात.

**वजन कमी करणे :-** सफरचंदात वजन कमी करण्याचे अनेक प्रभावशाली गुण असतात. शरीरात अतिरिक्त चरबी वाढत नाही. नसांमध्ये फॅट जमा होत नाही. रक्तप्रवाह सुरळीत सुरु राहतो.

**त्वचेसाठी :-** सफरचंद आणि मध यांचे मिश्रण दुधात मिसळून त्वचेवर लावल्यास त्वचा चमकदार बनते. सफरचंदमध्ये सापडणाऱ्या प्रतिरोधकामुळे त्वचा अधिक चमकदार बनते. चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि काळे धब्बे कमी करण्यासाठी सफरचंदाचे सेवन आणि लेपण अत्यंत प्रभावी ठरते.

**स्मृतीभ्रंशाचा त्रास टाळण्यासाठी :-** नियमित एक सफरचंद खाल्ल्याने आपली बुध्दी कार्यक्षम आणि कुशाग्र बनते. सफरचंदातील विशेष पोषक तत्व प्लेजर हार्मोन्स वाढवतात त्यामुळे स्मृतीभ्रंशाचा सामना करावा लागत नाही. कडक आणि धारा नसलेले सफरचंद सेवनास उत्तम असते. सफरचंद जास्त दिवस साठवून ठेवू नये. ❖





# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालरा




आई, आज संध्याकाळी मी, बंटी आणि चानी चिंटूच्या घरी अभ्यासाला जाणार आहोत.
बरं, जा! पण अभ्यासच करा हं. नाहीतर खोड्या करत बसाल आणि अभ्यास तसाच राहील.
चिंटू, आम्ही आलो!


किट्टी, चल आपण अभ्यास करु या. कुणीही कुणाची खोडी काढायची नाही.
ए, मी बंटीची वही लपवतो, सांगू नकोस हं कुणाला! मज्जा येईल.
अरे बंटी, तू होमवर्कची वही नाही आणलीस ?
अरे, मी तर वही घेऊन आलो होतो, कुठं गेली बरं ?


अरे, शोधा, कुठं गेली वही ?
किट्टी ऽऽ, बाळ किती उशिर झाला! चल घरी लवकर.
अरे देवा! बंटीची खोडी काढण्यात मी माझा होमवर्कच विसरले.
आता मॅडमच्या हातचा प्रसाद खावा लागेल. शी! आपण उगाचच खोड्या काढण्यात वेळ घालवला. यापुढे असं कधीच वागायचं नाही!

# साहित्य अकादमी पुरस्कार




साहित्य अकादमीद्वारा मान्यताप्राप्त भाषा २२ आहेत. या बरोबरच राजस्थानी आणि इंग्रजी सह एकूण २४ भाषेतील सर्वश्रेष्ठ साहित्यकृतीला हा पुरस्कार दिला जातो. सर्वप्रथम १९५५ मध्ये हा पुरस्कार दिला गेला. त्यावेळी या पुरस्काराची रक्कम पाच हजार रुपये एवढी होती. २००९ पासून ती एक लाख रुपये करण्यात आली आहे.

मराठीसाठी पहिला पुरस्कार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथाला लाभला.

## भाषा सन्मान पुरस्कार

प्रादेशिक भाषांच्या विकासासाठी हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराची सुरुवात सन १९९६ पासून साहित्य अकादमीतर्फे करण्यात आली. मान्यताप्राप्त २४ भाषांसाठी हा पुरस्कार देण्यात येतो.

हा पुरस्कार लेखक, संपादक, विद्वान, संकलक, कलाकार आणि अनुवादक यांना दिला जातो. ज्यांनी संबंधित भाषेच्या विकासात, प्रचारात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे अशा तीन-चार व्यक्तींना वेगवेगळ्या भाषेसाठी दिला जातो. या पुरस्कारात एक पट्टीसोबत एक लाख रुपये एवढी रक्कम दिली जाते.

अमान्यताप्राप्त भाषेतील साहित्यिकांना प्रोत्साहन म्हणून या पुरस्काराची सुरुवात झाली.

## अनुवाद पुरस्कार

१९८८ पासून साहित्य अकादमी तर्फे या पुरस्काराची सुरुवात झाली. हा पुरस्कार सर्जनशील लेखकांना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये प्रमुख मानला जातो. तो मान्यताप्राप्त २४ भाषेतील विशिष्ट लेखकांना दिला जातो. सुरुवातीला या पुरस्काराची रक्कम दहा हजार रुपये होती. २००३ पासून ही रक्कम वीस हजार रुपये एवढी करण्यात आली.

## बालसाहित्य पुरस्कार

साहित्य अकादमीतर्फे २०१० पासून सर्व प्रादेशिक भाषेतील बाल साहित्याचा विकास व्हावा यासाठी या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली. या पुरस्कारात एक लाख रुपये व मानचिन्ह लेखकास दिले जाते.

मराठी भाषेसाठी पहिला बालसाहित्य पुरस्कार श्री. अनिल अवचट यांना सृष्टीत.... गोष्टीत या कथा संग्रहाला मिळाला.

## युवा पुरस्कार

तरुण लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी २०११ पासून साहित्य अकादमीतर्फे या पुरस्काराची सुरुवात झाली. यासाठी युवा लेखकाचं वय ३५ वर्षांपर्यंत असावं. आतापर्यंत २०४ हून अधिक युवा लेखकांना हे पुरस्कार देण्यात आले. प्रशस्तीपत्र आणि पन्नास हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. ❖

❒ संग्राहक - नीलेश माने (अंबरनाथ)

# सण दसरा साजरा करु या




प्रभू रामांचे दिव्यगुण धारुनी सत्य मार्ग हा धरु या
अहंकाराचा जाळून रावण सण दसरा साजरा करु या


वेद शास्त्रांचा ज्ञाता जगती, रावण होते त्याचे नाव
सोन्याची नगरी वसवली, लंकानगरी त्याचे गाव
तप-त्यागाने जरी, अगम्य वरदाने मिळवली
विनम्रतेच्या अभावाने लंकापुरी गमवली

ज्ञानी असूनही जगतामध्ये, अज्ञानी तो जातो गणला
श्रीरामांचे निमित्त मात्र, गर्वाचा तो बळी हो ठरला
दसरा येता दहन करण्या, सर्वांना आठवतो रावण
प्रभूरामांची सत्य शिकवण, आपण करतो का धारण ?

कर्मातूनी दिसावे प्रेम, अवगुणांचे करावे दहन
सतवचनी राजा रामचंद्रांना, नित्य स्मरावे आपण
दया, करुणा, अन् प्रेमाने मानवता सदा सजवावी
दुर्गुणांचे करुन सीमोल्लंघन, दिव्य ज्योत जागवावी

- नीलेश माने (अंबरनाथ)





# चांगलं तेच द्यावं

एका आश्रमामध्ये देवदत्त नावाचे गुरु होते. त्यांच्या आश्रमात बरेचसे शिष्य शिक्षण घेत होते. त्यांच्यापैकी तीन शिष्यांचा शिकण्याचा कालावधी संपत आला होता. म्हणून गुरुदेवांनी त्या शिष्यांची परीक्षा घ्यावी असं ठरवलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी त्या तीनही शिष्यांना आपल्याजवळ बोलावून सांगितलं, की आता तुमचं इथलं शिक्षण पूर्ण झालेलं आहे. तेव्हा सात दिवसांसाठी तुम्ही घरी जा आणि आठव्या दिवशी येताना प्रत्येकाने टोपलीभर फळं घेऊन या. असे म्हणून त्यांनी तिघांनाही तीन टोपल्या दिल्या. तिन्ही शिष्य आपापल्या घरी गेले. आठव्या दिवशी गुरुदेवांना फळं घेऊन जायची आहेत म्हणून फळं घेण्यासाठी बाजारात गेले. पहिला शिष्य खूप प्रामाणिक होता. या निमित्ताने आपल्याला गुरुदेवांची सेवा करण्याची संधी मिळाली म्हणून तो खूशही होता. त्याने बाजारात जाऊन उत्तम प्रतीची मधुर फळं विकत घेतली.

दुसरा शिष्य थोडा आळशी होता. त्याने विचार केला, की गुरुदेव कुठे सगळी फळं खाणार

आहेत! तेव्हा आपण कशीही फळं नेली तरी काय फरक पडणार आहे! म्हणून त्याने हलक्या प्रतीची फळं घेतली.

तिसरा शिष्य थोडा कंजूष होता. त्याने विचार केला, की आपण वरवर चांगली फळं ठेवू आणि खाली खराब होत आलेली फळं ठेवू. नाहीतरी तिन्ही टोपल्या सारख्याच आहेत. गुरुदेवांना कुठे कळणार आहे, कोणाची टोपली कोणती आहे!

तिन्ही शिष्य ठरलेल्या दिवशी गुरुदेवांनी सांगितल्याप्रमाणे फळांच्या टोपल्या घेऊन आश्रमात पोचले. गुरुदेव त्यांना आशीर्वाद देत म्हणाले, "आता एक महत्त्वाची साधना तुम्हाला एकेकट्याला करायची आहे, आपापली टोपली उचला आणि समोरच्या वेगवेगळ्या खोलीमध्ये जा. चार दिवस तुमच्या खोल्या बाहेरुन बंद राहतील. या चार दिवसांत तुम्हाला भोजन मिळणार नाही. तुमच्याकडे असलेली फळंच फक्त तुम्ही खायची आहेत."

पहिला शिष्य प्रसन्न मनाने आपल्या खोलीत गेला; पण दोघेजण मात्र रडकुंडीला आले होते. कारण त्यांना स्वतःच आणलेली खराब फळं स्वतःलाच खावी लागणार होती.

तात्पर्य : आपण जे दुसऱ्याला देऊ तेच आपल्याला परत मिळत असतं. हा निसर्गाचा नियम आहे. प्रेम दिलं तर प्रेम मिळेल. म्हणून कोणालाही चांगलं तेच द्यावं. ❖

# विशेष सूचना

अत्यंत आनंद होत आहे, की सद्गुरुच्या कृपाशीर्वादाने आपल्या सर्वांचे आवडते मासिक हसती दुनिया (मराठी) या मासिकाला जानेवारी २०२४ मध्ये २० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने जानेवारी २०२४ मध्ये प्रकाशित होणारा हसती दुनिया (मराठी) चा अंक विशेषांक या रुपात प्रकाशित करण्यात येणार आहे.

तरी सर्व स्तरातील लेखक आणि वाचक वर्गाकडून कथा, कविता, गीतं, विशेष लेख या बरोबरच हसती दुनिया मासिकाबाबतचे आपले अभिप्राय इ. साहित्य मागवण्यात येत आहे. तसेच शालेय विद्यार्थ्यांकडून आपल्या शैक्षणिक, आध्यात्मिक व चारित्र्यात्मक विकासात हसती दुनियाचे लाभलेले योगदान व मिशनमध्ये सुरु असलेल्या उपक्रमांविषयी अनुभव पाठवावेत. उदा. स्वच्छता अभियान, रक्तदान, वृक्षारोपण, NYS इ. आपल्या भावना, स्वरचित कथा, कविता इ. सुवाच्य अक्षरात लिहून पाठवाव्यात, ही विनंती.

आपले साहित्य हसती दुनिया (मराठी) विशेषांक असे ठळक अक्षरात नमूद करुन दि. २५ ऑक्टोबर २०२३ पर्यंत पोस्टाने किंवा ईमेल आयडी वर पाठवावे.

पत्ता :- संपादक, हसती दुनिया (मराठी)

पत्र-पत्रिका विभाग, संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४

ईमेल आयडी - marathihastiduniya@gmail.com / hduniya.marathi@nirankari.org

# भारतातील प्रसिध्द व्यक्तींची स्मृती स्थळे (समाधी स्थळ)

❑ राजघाट :- राजघाट हे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे समाधी स्थळ असून ते दिल्ली येथे यमुना नदीच्या किनारी आहे.

❑ शांतिवन :- शांतिवन हे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचे समाधी स्थळ आहे. हे ठिकाणही दिल्ली येथेच असून राजघाटच्याच परिसरात आहे.

❑ विजयघाट :- विजयघाट हे भारताचे माजी पंतप्रधान श्री. लाल बहादूर शास्त्री यांचे समाधी स्थळ आहे. हे दिल्ली येथे स्थित आहे.

❑ समता स्थळ :- भारताचे माजी उपपंतप्रधान जगजीवनराम यांचे हे समाधी स्थळ असून हे दिल्ली येथे आहे.

❑ चैत्यभूमी :- भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे समाधी स्थळ आहे. हे ठिकाण मुंबई (दादर) येथे आहे.

❑ अभयघाट :- माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांचे हे समाधी स्थळ अहमदाबाद (गुजरात) येथे स्थित आहे.

❑ एकता स्थळ :- हे भारताचे आठवे राष्ट्रपती ग्यानी झैलसिंह यांचे समाधी स्थळ आहे. हे एकता स्थळ भारताची एकता आणि अखंडतेचे प्रतीक मानले जाते. हे स्थळ नवी दिल्ली येथे दरियागंज या भागात आहे.

❑ किसान घाट :- हे समाधी स्थळ भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांचे आहे. हे स्थळ दिल्ली येथे आहे.

❑ वीरभूमी :- भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे हे समाधी स्थळ असून ते नवी दिल्ली येथे आहे.

❑ शक्ति स्थळ :- भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे हे समाधी स्थळ आहे.

❑ महाप्रयाण :- भारताचे पहिले राष्ट्रपती भारतरत्न डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे हे समाधी स्थळ आहे. हे समाधी स्थळ पाटणा (बिहार) येथे स्थित आहे.

❑ नारायण घाट :- भारताचे दोन वेळेस हंगामी पंतप्रधान पद भूषवलेले गुलझारीलाल नंदा यांचे समाधी स्थळ नारायण घाट नावाने सुपरिचित आहे.

❑ उदयभूमी :- भारताचे माजी राष्ट्रपती के.आर. नारायणन यांचे हे समाधी स्थळ आहे. दिनांक ९ नोव्हेंबर २००५ रोजी त्यांचे नवी दिल्ली येथे निधन झाले होते.

❑ प्रीतिसंगम :- भारताचे माजी उपपंतप्रधान आणि महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे हे समाधी स्थळ आहे. हे ठिकाण सातारा जिल्ह्यात कराड येथे स्थित आहे.

❑ कर्मभूमी :- भारताचे नववे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांचे हे समाधी स्थळ आहे.

❑ स्मृती स्थळ :- भारताचे दहावे पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांचे हे समाधी स्थळ नवी दिल्ली येथे स्थित आहे. ❖





# योग्य पर्याय निवडा

१) दसरा सणाद्वारे मिळणारी शिकवण ..... सोनं हे वाटायचं असतं / दुष्ट प्रवृत्तीवर विजय मिळवावा

२) खेळाचे प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकाला दिला जाणारा पुरस्कार.....द्रोणाचार्य पुरस्कार / साने गुरुजी पुरस्कार

३) पृथ्वीचे आयुष्य ..... साडेचारशे अब्ज वर्षे / साडेचारशे कोटी वर्षे

४) दिनार हे या देशाचे चलन आहे..... इराक / पाकिस्तान

५) पहिली भारतीय अंतराळवीरांगणा..... कल्पना चावला / सुनीता विल्यम

६) संत तुकडोजी महाराजांना दिलेली उपाधी..... लोकसंत / राष्ट्रसंत

७) रामायणात यांना विदेही म्हटले आहे..... शुकदेव मुनी / राजा जनक

८) पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे मराठी लेखक.....विष्णू सखाराम खांडेकर / विष्णू वामन शिरावाडकर

९) रावणाच्या वडिलांचे नाव..... विश्रवा ऋषी / पुलस्त्य ऋषी

१०) महात्मा गांधी यांचे आत्मचरित्र..... माझी जन्मठेप / सत्याचे प्रयोग

११) दृष्टीदोष दूर करणारे जीवनसत्व..... जीवनसत्व अ / जीवनसत्व ब

१२) २ ऑक्टोबर हा दिवस या नावाने जगभर साजरा केला जातो...गांधी जयंती / आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस

१३) जागतिक शिक्षक दिन..... ५ सप्टेंबर / ५ ऑक्टोबर

१४) आद्यकवी यांना म्हटले आहे..... वाल्मिकी ऋषी / संत ज्ञानेश्वर

१५) ‘इस्त्रो’ नें चांद्रयान - ३ चंद्राच्या या ध्रुवावर उतरवून विश्वविक्रम केला..... उत्तर ध्रुव / दक्षिण ध्रुव

उत्तरे इतरत्र

# कृत्रिम बुध्दिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) क्षेत्रातील विविध पर्याय...

| क्षेत्र | कौशल्य / कामाची जबाबदारी | नोकरीच्या संधी / उच्चशिक्षण |
|---|---|---|
| १. मशिन लर्निंग अभियंता (Machine Learning Engineer) | स्वयंचलित सॉफ्टवेअर विकसित डिझाइन करुन त्यांना उपयोजित (Apply) करण्याचे कौशल्य या अभियंताना प्राप्त असते. हे सॉफ्टवेअर, मशीन्सना भविष्यात काय करावे याच्या स्वयंचलित सूचना करण्यास सक्षम असतात. याचे उदाहरण म्हणजे आपण वापरत असलेली स्ट्रीमिंग ॲप्स तुम्ही सर्वात जास्त पाहत असलेल्या शोच्या आधारावर आपण काय पाहावे याची शिफारशी. याशिवाय, व्हर्च्युअल असिस्टंट, ड्रायव्हरलेस कार, ट्रॅफिक अंदाज या करिता हे अभियंते कार्यरत असतात. | विविध कंपन्यांमध्ये तथा मल्टीमेडिया कंपन्यांमध्ये संगणक विज्ञान, डेटा प्रोग्रामिंग इंजिनिअर यांसारखी महत्त्वाची पदे प्राप्त करु शकतात. |
| २. डेटा सायंटिस्ट (Data Scientist) | विविध विश्लेषणात्मक आणि सांख्यिकीय AI साधनांचा वापर करुन जटिल डेटा गोळा करुन त्याचे विश्लेषण करणे त्याचबरोबर कच्च्या डेटामधून मौल्यवान माहिती काढणे आणि स्पर्धात्मक बाजारपेठेत व्यावसायिक संस्थांना व्यवसायात वाढ करण्यासाठी त्या माहितीचा पुरवठा करणे हे काम डेटा सायंटिस्ट अभियंताचे असते. उदा. फूड डिलिव्हरी ॲप्समध्ये, आपल्या मागील ऑर्डर, ब्राउझिंग बेस वर आपण काय order करणार त्यावर आपल्याला सूट दिली जाते ही कमाल डेटा सायंटिस्ट ची असते. | विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये डेटासायंटिस्ट, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून नोकरीची संधी. |
| ३. रोबोटिक्स अभियंता (Robotic Engineer) | रोबोटिक्स अभिंयते रोबोट विकसित करण्याचे कार्य करतात जे मानवी हस्तक्षेपाशिवाय अनेक कार्ये सहज आणि सुलभतेने करु शकतात. कमी वेळेत अचूक कामे त्याचबरोबर कमी खर्चात करुन घेण्यासाठी संगणक विज्ञान, अभियांत्रिकी, संज्ञानात्मक मानसशास्त्र आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या घटकांना एकत्रित करुन रोबोट बनविण्याचे काम हे अभियंते करतात. | विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांमध्ये अवकाश विज्ञान क्षेत्रात आज रोबोट बनवण्याकरिता या अभियंत्याची प्रचंड मागणी आहे. आताच भारताच्या यशस्वी चंद्रमोहीमेतील विक्रम रोव्हर त्याचे उत्तम उदाहरण होय. |
| ४. बिझनेस इंटेलिजन्स डेव्हलपर (Business Intelligence Developer) | सॉफ्टवेअर सोल्यूशन विकसित करणे, तांत्रिक प्रश्नांची रचना करुन अचूक शोध विनंत्या विकसित करणे त्याचबरोबर बॅकअप घेणे आणि डेटा सुरक्षितपणे साठवणे ही मुख्य कार्य डेव्हलपर करतात. त्याचबरोबर data समजावून घेण्यासाठी व्हिज्युअल तयार करणे याशिवाय त्यांनी डेटा गोळा करुन विश्लेषण करणे, डेटा प्रक्रियेसाठी नवीन उपाय तयार करणे, साधनांमधील त्रुटी दूर करणे आणि सुधारणा उपायांची अंमलबजावणी करणे यासारखी कामे या अभियंत्यांना करावी लागतात. | अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये बिझनेस इंटेलिजन्स डेव्हलपर म्हणून काम करण्याची संधी |






| | | |
|---|---|---|
| ५. एआय एथिसिस्ट (AI Ethicist) | AI नीतिशास्त्रज्ञांना सिस्टममध्ये नैतिक, राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोन स्थापित करण्याचे मुख्य काम दिले जाते. हे सिस्टीम किंवा मशीन्सना पारदर्शक आणि निःपक्षपाती पध्दतीने कार्य करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे बनवतात. गतवर्षात ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर गोळा केलेल्या डेटाच्या संभाव्य अनैतिक वापरामुळे अनेक दिग्गज संस्था कायदेशीर लढाईत उतरले आहेत. | एआयशी संबंधित नैतिक जोखमींना कमी करण्यासाठी, कंपन्या तज्ञ नैतिकशास्त्रज्ञांना नियुक्त करण्यास उत्सुक आहेत. त्यामुळेच नोकरीच्या बाजारपेठेत एआय एथिसिस्टना मोठी मागणी आहे. |
| ६. एआय वैज्ञानिक (AI Scientist) | नवीन अल्गोरिदम (प्रोसेस चार्ट) तयार करणे, विद्यमान मॉडेल्सवर विविध प्रयोग करण्याची जबाबदारी. सोप्या शब्दात सांगायचे तर, त्यांचे कार्य म्हणजे मशीन ज्याप्रकारे विचार करते आणि ऑपरेट करते त्या पध्दती सुधारणे. त्याच बरोबर प्रोसेस चार्ट डेटाचे विश्लेषण आणि नमुने तयार करण्याचे काम एआय संशोधकांना करावे लागते. | आरोग्य सेवा, वित्त, विपणन, विमा, उत्पादन यांसारख्या उद्योगांमध्ये एआय वैज्ञानिकांना मोठा वाव आहे. |
| ७. यूएक्स डिझायनर (UX Designer) | वापरकर्ता एखादे / सेवा / वेबसाईट याचा वापर करीत असताना यूएक्स डिझायनर त्याच्या वर्तनाचे सूक्ष्म निरीक्षण करुन त्याच्या आधारे / सेवा / वेबसाईट यांच्यात आवश्यक सुधारणा सुचवण्याचे काम यूएक्स डिझायनरचे असते. उदा. तुम्ही हॉटेल बुकिंग वेबसाईटला भेट देता तेव्हा, यूएक्स डिझायनर तुमची संपूर्ण शोध प्रक्रिया जलद आणि वापरास अनुकूल असल्याची खात्री करुन त्यानुसार वेबसाईट मध्ये आवश्यक डिझाईन बदल करतो. | आजच्या व्यावसायिक जगतात बऱ्याच बहुराष्ट्रीय कंपन्या, लहानमोठे उद्योजक आपला व्यवसाय वाढवण्यासाठी या टूल्सचा प्रभावी वापर करतात. त्यामुळे नोकरीची असंख्य संधी उपलब्ध आहेत. |

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने मशीन, कॉम्प्युटर आणि यंत्र बनवून येणाऱ्या काळात महत्वाची कामे करण्यासाठी मानवाच्या बदली (ऐवजी) वापर केला जाऊ शकतो. जॉन मॅककार्थी (John McCarthy) यांनी १९५६ साली आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शोध लावला. सध्या ह्या तंत्रज्ञानाला खूप मागणी आहे. भविष्यात AI हे तंत्रज्ञान मानवी जीवनाचा एक हिस्सा बनणार आहे, अनेक ऑनलाईन कंपन्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मार्फत ग्राहकांना अनेक चांगल्या सेवा देऊ शकतात. AI चे ज्ञान असलेल्या एक्सपर्टची मागणी गेल्या काही वर्षांमध्ये झपाट्याने वाढत आहे, ज्यामुळे रोजगाराच्या मुबलक संधी निर्माण झाल्या आहेत, होत आहेत आणि निर्माण होत राहतील. फेस आयडी ओळख, नेव्हिगेशन नकाशे, चॅटबॉट्स, व्हॉईस असिस्टंट, शोध इंजिन, टेक्स्ट एडिटर ते स्मार्ट होम डिव्हाइसेसपर्यंत एआय आजच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहे. या उत्क्रांतीमुळे रोजगाराच्या मुबलक संधीही निर्माण झाल्या आहेत.

भारतातील पहिलं AI विद्यापीठ महाराष्ट्रात, मुंबई जवळील कर्जत येथे सुरु झाले आहे. १ ऑगस्ट २०२३ पासून या विद्यापीठाचं पहिलं शैक्षणिक वर्ष सुरु झाले असून, युनिव्हर्सिटीमध्ये AI आणि भविष्यातील तंत्रज्ञानामध्ये विशेष पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवले जातात.



## रंग भरा




## सामान्यज्ञान उत्तरे

१) दुष्ट प्रवृत्तीवर विजय मिळवावा
२) द्रोणाचार्य पुरस्कार
३) साडेचारशे कोटी वर्षे
४) इराक
५) कल्पना चावला
६) राष्ट्रसंत
७) राजा जनक
८) विष्णू सखाराम खांडेकर
९) विश्रवा ऋषी
१०) सत्याचे प्रयोग
११) जीवनसत्व अ
१२) आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस
१३) ५ ऑक्टोबर
१४) वाल्मिकी ऋषी
१५) दक्षिण ध्रुव

## शब्दकोडे

## २२३ चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ द | | २ चो | | ३ मा | ४ हे | ५ र |
| ६ म | हा | वी | ७ र | | ८ र | स |
| यं | | ९ स | हा | रा | | म |
| १० ती | ११ न | | ट | | १२ वा | ल |
| | १३ वी | १४ स | | १५ स | न | ई |
| १६ स | न | त | कु | मा | र | |
| चि | | ल | | धा | | १७ झै |
| १८ न | मा | ज | | १९ न | कु | ल |

!! तू ही निरंकार !!

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी ।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी ।
पूर्ण सदगुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी ।

पूर्ण सदगुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी ।
पूर्ण सदगुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी ।
पूर्ण सदगुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी ।



शंकरराव जाधव
संयोजक, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा । घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा ।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है । ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है ।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा। उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा।
गुरू की जैं जैं जो करता है उसकी होती जैं जैं कार। गुरू की पूजा जो करता है उसको पूजे कुल संसार।

११९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

॥ तुही निरंकार ॥



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील — राकेश ज. पाटील
अंचित रा. पाटील — कुशल रा. पाटील